श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १५ ] आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष [ अंक ७-८-९.

शके १८६०

O. T.

25 SEP 1939



नलिनीदलगत जलमतितरलम् तद्वज्जीवितमतिशयचपलम्
क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका

—शंकराचार्य

संपादक—रामचंद्र वासुदेव [illegible]

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| संपादकीय ... ... ... ... | ३ |
| हरीओम् ... ... ... ... | ५ |
| श्री जोड शिर्डी येथील गुरुपौर्णिमेचा खर्चाचा तपशील ... | १३ |
| श्री गुरुपौर्णिमेबद्दल वर्गणी आलेली रक्कम ... ... | १६ |
| श्री शिर्डी संस्थान गोकुळ अष्टमी उत्सव ( जमाखर्च ) ... | २० |
| गोकुळ अष्टमी उत्सव .... ... ... | २२ |
| श्री. ल. दा. चि. वाचनालय वृत्त ... ... ... | २३ |
| इंग्रजी शेरेबुकाची नक्कल ... ... | २६ |
| अनुभव .... ... ... ... | २९ |
| शिर्डीवृत्त ... ... ... ... | ५१ |
| देणगी ... ... ... ... | ६० |


## विनंती

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं ज्यांनीं वर्गणी अद्याप पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी, अथवा व्ही. पी. करण्याचें सुचवावें.

वार्षिक वर्गणी टपालखर्चासह मानिऑर्डरीनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें.रु. ३॥, फुटकळ अंक ४ आणे. मागील अंकास शिल्लक असल्यास ४ आणे.


—संपादक

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठवावयाचे असतील, त्यांनीं ते आमच्याकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.


रा. वा. घैसास, संपादक.

लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नंबर २,
गोखले रोड नॉर्थ दादर, मुंबई १४.



गोदावर्याः प्रवाहो विलसती यदुदक्पार्श्वतो योजनैकं ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्याऽनिशजनितमहै शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्वब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

शके १८६० ) श्रीसदगुरु साईनाथ. ( वर्ष १५ अंक ७-८-९

## श्री साईबाबा

# Editorial Note

Readers may look forward to short monographs in our future issues on subjects like **" Spiritual illusions and Dis-illusions " " Are miracles credible ? " " The confessions of an unwilling convert to Baba " " Limitations of finite Man in comprehending the Infinite " " When and where the experiences Sai Baba cross the bounds of the accidental " and others.**

We earnestly request our readers and others to send us contributions in English and Marathi for this Magazine. We reserve the right of amending the language, where necessary, to eschew what may not be worthy of publication in this Magazine. We may assure our readers that even atheistical contributions when well reasoned out and expressed in dignified language, will find a place and may even be replied to. Due regard will be paid to all correspondence.

Tilak Jubili Trust
Building, No 2,
Gokale Road North,
Dadar.
September 1939.

R. V. Ghaisas,
Editor & Proprietor.
Shri Sai Lila.

## श्रीसाईनाथ
## संपादकाचा साक्षात्कार

—१—

मी मनमाड स्टेशनवर रेल्वेमेल सॉरटींग ऑफीसमध्यें नोकरीस असलेमुळें माझी कै. काकासाहेब दिक्षीत यांचेमार्फत पुरंदरे, दाभोळकर, काका महाजनी, बाबासाहेब तरखड, दास गणू महाराज वगैरेंची मंडळी शीरडीस जात येत असल्यानें ओळख झाली व त्यांचेच मार्फत मला श्रीसाईबाबांची कीर्ति समजली. त्यामुळें माझे मनांत श्रीसाईबाबा यांचेबद्दल भक्ति व आदर उत्पन्न झाली. तेव्हां मी कै० काकासाहेब दिक्षित यांचेजवळ "बढती मिळण्याची वेळ असूनहि दोन तीन वेळा आलेली संधी सहजा सहजी गेली." असे सांगितलें. त्यावेळीं त्यांनीं मला श्रीसाईबाबांचा एक फोटो दिला व सांगितले कीं, तुम्हाला काय मागावयाचे असेल ते यां फोटोकडे मागणी करा, म्हणजे तुम्हास त्याचें उत्तर मिळेल. तेव्हां माझे मनांत श्रीसाईबाबांचेबद्दल जास्तच भक्ती उत्पन्न झाली. थोडे दिवसांनी मला स्वप्न पडलें कीं मी तीन वाकी करून त्यांची पूजा करीत जावी, म्हणजे इच्छीत कार्य होईल. परंतु या स्वप्नाचा उलगडा मला कांहीं होईना. तेव्हां कै. काकासाहेब दिक्षीत शिरडीस जाण्याकरितां मनमाडास आले, त्यावेळीं त्यांस स्वप्नाबद्दल विचारलें. तेव्हां ते म्हणाले कीं, श्रीसाईबाबांचा दत्ताचा अवतार आहे. सबब तुम्हास २ अगर ४ वाकी करण्यास न सांगता तीनच वाकी करण्यास सांगितल्या. इतक्या अवधित आणखी एक संधी मागच्याप्रमाणेंच गेली. तेव्हां नक्की विचार केला कीं आज एकादशी आहे, आज तीन वाकी सोनाराकडून करून पूजा करावयाची व नंतरच फराळ

वगैरे करावयाचा, तोपर्यंत आज कांहीं एक खावयाचे नाहीं. ठरलेल्या निश्चयाप्रमाणें बाकीची प्राणप्रतिष्ठा केली. व नित्य कार्यक्रम करण्यास सुरवात केली. एवढें केल्यानंतर एक आठवड्याचे आंत कांहीं एक कारण नसतां मला बढतीची जागा मिळाली. " मी श्री साईबाबांची भक्ति म्हणजे श्रीसाईबाबांच्या शिरडीस जाणाऱ्या येणाऱ्या माणसाना रात्रीं, बेरात्रीं, त्यांच्या सोईप्रमाणें रेल्वेच्या गाडींत बसवून देण्याची सोय अगदीं काळजीपूर्वक करीत असें.

—२—

मी मनमाड येथें असतांना माझे कुटुंब कमी दिवसाचें अकालीं प्रसूद झालें. तिचा आजारपणा अतिशय वाढला. तिची प्रकृती दिवसेंदिवस इतकी खालावत जाऊं लागली कीं, त्यांतून निभाऊन जाणें फार अशक्य झालें होतें. डॉक्टरांनीं पण शेवटचाच निर्णय सांगून मोकळे झाले होते. अशी ही भयंकर परिस्थिती येऊन ठेपली होती. या संकटातून मुक्त होण्याकरितां नित्य नियमानें मी श्रीसाईबाबांची मनोभावानें प्रार्थना करीत होतों. श्रीसाईबाबांच्यांत पूर्ण ईश्वरी अवतार असल्यामुळें त्यांनीं मला पुढील गमतीचा दृष्टांत दिला.

"एक दिवस मी झोपलों असतां मला एक स्वप्न पडलें कीं, मी व माझा मित्र शेख काबूला असे आम्ही दोघे कल्याणच्या खाडीवर फिरावयास गेलों आहोंत. तेथें आम्ही एका नावाड्याकडून फिरण्यास जाण्याकरितां एक होडी भाड्यानें घेतली. नंतर आम्ही त्यांत बसल्यावर त्यानें ( नावाड्यानें ) नाव चालू केली. खाडी पूर्ण भरून गेली होती. नावाड्यानें आम्हास त्यांच्या नेहमींच्या रितीप्रमाणें ज्या दिशेनें खाडीचे पाणी वहात येत होते, त्या दिशेला आमची होडी जवळ जवळ फर्लांग दीड फर्लांग अधिक लांब गेली. व तेथून पलीकडच्या बाजूस जाण्या-

करितां त्यानें नाव सोडली. मला समुद्राचें कांहींच ज्ञान नसल्यामुळें मला तें कळलें नाहीं. मी शेख काबूलशीं गप्पा मारण्यांत गुंग होतों. मधूनच खाडीतील मासे धरणाऱ्या कोळ्यांच्या ताफ्याकडे पहात होतो. इतक्यांत माझें लक्ष माझ्या होडीवाल्याकडे गेलें. परंतु काय चमत्कार झाला—आमचा नावाडी वल्हेवाला आम्हास सोडून नाहींसा झाला आहे, असें दिसलें. हें मी शेख काबूलला सांगण्याकरितां म्हणून मागें वळून पाहिलें तों—तो पण नाहींसा झाल्याचें आढळून आलें. हा चमत्कार पाहून मी अगदीं आश्चर्य चकीत झालों. तेव्हां माझ्यापुढें, आपण या संकटांतून कसे पार पडणार ? असा प्रश्न उभा राहीला. जवळच मासे धरणाऱ्या कोळ्यांना मी आमच्या होडीवाल्याविषयीं विचारलें. तेव्हां ते म्हणाले—तो तर आतां या ठिकाणी होता. इतकें होतां होतां होडी कशी तरी पलीकडच्या बाजूस ज्याठिकांणी चिखल होता त्या ठिकाणी बऱ्याच अंतरावर पोचली. इतक्यांत पहाट झाली. म्हणून मी उठलो, व या स्वप्नाचा विचार करूं लागलों. जागा झाल्याबरोबर मी प्रथम बाबांची प्रार्थना करून असा कयास बांधला कीं, माझें कुटुंब या आजारांतून खात्रीनें दगावणार नाहीं. पुढें खरोखरच माझ्या कयासाप्रमाणें तिची तब्बेत हळूहळू सुधरूं लागली.

श्रीसाईबाबांची आमच्यावर पूर्ण कृपा असल्यामुळें त्यांच्या कृपेनें तिच्या प्रकृतींत आराम पडून पुढें कांहीं दिवसांनीं हिंडू फिरूं लागली-या गोष्टीमुळें आमची श्रीसाईबाबांच्यावर अधिकच श्रद्धा बसली.

NOTE.

I am very much glad to inform you that Mr. C. Cumiah Chetty, Millowner, Nawabpet, has established Shri Sai mandal at Nellore under his Secretaryship as Rao Sahab B. Pappiya Chetty, Seeretary, has opened the Shri Sai mandal at Madras. The Bhajaun of Sai Baba is very well attended gradually on every Thursday at both places.

R. V. Ghaisas

॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

# हरीःओम्

श्री साईभक्त व साईलीला आश्रयदाते यांसी विनंति.

श्री साईलीला नवीन स्वरूपांत आज आपल्या भेटीस येत आहे. तिचा स्वीकार करावा. नियमितपणा व मजकूर या बाबतींत जशी उच्च प्रतीची आपली सेवा आम्हांकडून व्हावयास पाहिजे होती तशी जाहली नाहीं याची आम्हांस जाणीव असलेमुळें जाहले दोषांबद्दल आम्ही दिलगीर आहोंत. तेव्हां आपण दयाद्रदृष्टीनें माफ कराल अशी आशा आहे.

वरील आपत्तीस बरींच निरनिराळीं कारणें घडलीं. मलपृष्ठावरून आपणांस दिसून येईल कीं संस्थान कमिटीनें श्रीसाईलीलेचे मध्यंतरचे संपादकत्व व तिची व्यवस्था यांत बदल करून एक सन्मान्य साईभक्त, श्रीयुत रा. वा. घैसास, संस्थान कमिटीचे सह खजिनदार, यांचेकडे या दोन्ही बाबतींत जबाबदारी सोंपविली आहे. सबब दरम्यानचे कालांत जी हयगय झाली तिच्या निरनिराळ्या कारणांचा विशिष्ठ उल्लेख करण्याची आवश्यकता आतां राहिलेली नाहीं. मात्र त्याचा परिणाम असा जाहला कीं लीलेचे आश्रयदात्यांचा वर्ग नाखूष जाहला व साहजिकपणेंच त्यांची संख्याहि बरीच घटली. यामुळें गेले दोन तीन वर्षें लीलेचे प्रसिद्धी करण्याचे बाबतींत सुमारें आठशें रुपयांचा संस्थानास तोटा सोसावा लागला. असो.

वरील योजनेमुळें आणि तत्वज्ञान, धर्म चर्चा, संतांचे अवतार व त्यांचे इहलोकीचे कार्य या विषयांवर अधिकारयुक्त वाणीनें लिहिणारे महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध लेखकांचे संपादकीय कार्यांत संस्थान कमिटीनें सहाय्य मिळविलें असल्यामुळें **श्रीसाईलीला** यापुढें वक्तशीर निघून

वाचकवर्गास श्रीबाबांचे अनुभव व धर्म प्रवृत्तीपर व मननीय लेख सादर होतील अशी उमेद बाळगल्यास तें वावगें होणार नाहीं. साईलीलेचे मुख्य कार्य म्हटलें म्हणजे हें आहे कीं ज्या चमत्कारांच्या योगानें श्रीसाईबाबांनीं आपल्या इहलोकीच्या सदेह वस्तींत भक्तांस अनुभव दाखवून आपली दैविक शक्ति पटवून दिली व अद्यापहि ते समाधिस्थ होऊन वीस वर्षें झालीं तरी आपली अतर्क्य शक्ति जुनें भक्तगणांचे निदर्शनास आणून देऊन नवीन भक्तांस आपले चरणीं आणीत आहेत त्या चमत्कारांचे वर्णन देणें व तद्वारा संसारांत मग्न झालेल्यानीं पारमार्थिक मार्गाकडे आपला दृष्टीकोन वळवावा म्हणून जी अंतःप्रेरणा श्रीसाईनाथ देतात त्याची सर्व साधारण जनतेस जाणिव करून देणें हेंच होय.

श्रीसाईनाथांची लीला ( High Power ) किती अगाध व अगम्य आहे व ती निरनिराळे प्रदेशांत व स्वरुपांत कशी निदर्शनास येते याची अलिकडील ढळढळीत उदाहरणें म्हणजे मद्रास इलाख्यांत गेले दीड वर्षांत जी साईभक्तीची लाट उसळली आहे व मुंबईस ग्रँटरोडवर श्रीसाईबाबा सार्वजनिक धर्मार्थ दवाखाना याची स्थापना जाहली ही होत; " **श्रीसाईबाबा सार्वजनिक दवाखाना** " ही संस्था मुंबईतील सुप्रसिद्ध अनुभाविक स्त्री व पुरुष डॉक्टरांस व सर्वमान्य नागरिकांस श्रीसाईबाबांनींच प्रेरणा करून कशी आस्तित्वांत आणिली गेली याची इतरत्र× या संस्थेचे उद्‌घाटन समारंभाची दिलेली हकीकत वाचून कोणासही सप्रेम कुतुहल वाटल्याशिवाय राहाणार नाहीं. वीर के. एफ नरिमन, डॉ. के. आर. ठक्कर, डॉ. कैकिणी, डॉ. मिसेस मालिनीबाई सुकथनकर, डॉ. सुवर्ण, डॉ. उम्रणकर व अध्यक्ष श्रीयुत जमनादास द्वारकादास यांचेसारखीं सामाजिक, धार्मिक आणि राजकीय विचारांत व आचारांत निरनिराळीं

:×. श्री साईलीला जोड अंक ४-५-६ वर्ष, १९.

व कांहीं प्रसंगीं विरुद्ध मतें प्रतिपादन करणारीं मंडळी श्रीसाईबाबांची एकमुखानें महती गातात व त्यांचे नाम धारण करणारे संस्थेस एकदिलानें मदत करितात हे पाहून कोणते साईभक्ताचे मन भक्तिप्रेमानें उचंबळून येऊन डोळ्यांतून आनंदाश्रु गळणार नाहींत ! श्रीबाबांची लीला अगाध व अतर्क्य आजमितीसही आहे हाच निष्कर्ष निघतो. असो.

मद्रास हायकोर्टाचे सुप्रसिद्ध अडव्होकेट उर्फ वकील श्री. बी. व्ही. एन. स्वामी, ज्यांची मद्रास इलाख्यांत मद्राचे टिळक उर्फ सिंह म्हणून देशभक्ति, निर्भयता, बुद्धिमत्ता व स्वार्थत्याग या गुणांबद्दल ख्याति आहे, ते श्री. साईबाबांचे एक नवीन निस्सिम भक्त बनले आहेत हा एक चमत्कारच होय. त्यांनी श्री बाबांस कधींच पाहिले नाहीं. परंतु तीन चार वर्षीपूर्वी साकोरीचे उपासनी महाराज यांची भगवत्भक्त म्हणून कीर्ति ऐकून ते साकोरीस आले व श्रीसाईबाबा हे उपासनींचे गुरू होते हें ऐकून पुढें शिर्डीस येऊन श्रीसाईनाथांचे चरित्राबद्दल त्यांनी जुने नवे भक्तगणांत बारकाईने चौकशी केली. आश्चर्य कीं साकोरी ऐवजीं ते शिर्डीचे श्री साईबाबांचे भक्त जाहले व त्यांनी मद्रासकडे श्री साईनाथांची भक्तमंडळें स्थापिली आहेत व बाबांची इंग्रजींत, व तामीलमध्ये लहान लहान चरित्रे व हस्तपत्रके छापून वाटली व विकली आहेत. या साईबाबा मंडळांत विश्वविद्यालयाचे मोठे पदवीधर पुरुष व स्त्रिया, हायकोर्ट वकील व सुप्रसिद्ध व्यापारी वगैरे मंडळी सामील जाहली आहेत. दर आठवड्यास व पंधरवड्यास आरत्या, प्रवचने श्री साईबाबांचे चरित्र व अनुभव यांचे कथन या निरनिराळे मंडळांतून होते. तिकडील मंडळी द्रव्य पाठवून शिर्डी संस्थान भक्त मंडळाचे तहाह्यात सभासद व आश्रयदाते होत आहेत. शिर्डीस फावले वेळीं श्री समाधि मंदिर, द्वारकामाई व चावडी यांचे दर्शन घेऊन तेथें कांहीं धर्मकृत्यें

करून परत जात आहेत. त्यांचेकडूनच उत्सवांकरतांही वर्गणी रूपानें मदत होत आहे.

वर लिहिलेला भाग श्री साईलीला पुढें चांगले रितीने चालविण्याचे कामीं अप्रस्तुत आहे असे कांहीं वाचकांस वाटण्याचा संभव आहे. परंतु वस्तुस्थिती तशी नाहीं. श्री साईलीलेंत या पुढें सुमारे ८-१० पानें मजकूर इंग्रजी भाषेंत पर प्रांतीय म्हणजे गुजरात, मध्य हिंदुस्थान, व मद्रास वगैरे मराठी न जाणणारे भागांतील साईभक्तांचे हिताकरितां घालण्याचा संपादकांचा विचार आहे. हें आपणांस कळले म्हणजे वरील मद्रास प्रांतांतील साईभक्तीचे प्रसाराची हकिकतच या लेखांत गैर लागू आहे असे आपणांस वाटणार नाहीं. शिर्डी संस्थान कमिटीने शिर्डीस रेल्वेने कसें यात्रे या विषयीं व तेथील श्री साईनाथांच्या लीलेची स्थाने वगैरे प्रेक्षणीय स्थळाचे वर्णनाचे एक छोटेखानी पुस्तक " A guide to Shirdi " म्हणून परप्रांतील भक्तांचे विनंतीवरून इंग्रजींत छापून प्रसिद्ध करून वाटले आहे. परप्रांतीय भक्तांचे साईचे अनुभव, भक्त मंडळांची कार्यें व सभा वगैरे कार्यक्रम यथावकाशें मराठींत इंग्रजींत या पुढें प्रसिद्ध होतीलच. असो.

शेवटीं वाचक व आश्रयदाते यांस विनंति कीं आपले श्री साईलीलेवरील प्रेम कायम ठेवून यापुढे या नियत कालिकाचे आश्रयदाते व वाचक यांची संख्या हस्तेपरहस्ते वाढविण्याचा प्रयत्न करून त्या कामीं यश संपादन करावे अशी श्री साईबाबांची प्रार्थना करून आपली प्रेमपूर्वक रजा घेतो.

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटीचे अनुज्ञेवरून

३७, चरई रोड, ठाणें. सप्टेंबर १९३९.

**श्री. ना. खारकर.**
ऑ. चिटणीस, शिरडी संस्थान कमिटी.

# Obeisance to the Great Guru

# SHRI SAI BABA

## HARI OM

Dear Sai Bhaktas and Readers of Shri Sai Lila Magazine,

In due deference to the wishes for the benefit of non-Marathi-speaking devotees of Sai Baba all over India, the Shirdi Sansthan Committee have decided to include an English Section in this Magazine and a beginning is being made with this issue.

We must, however, first of all apologise to all our readers particularly those from the Madras Presidency, for the irregular publication of this Periodical and for the inferiority of its substance and matter from the spiritual point of view in the past couple of years.

The Sansthan Committee, in consequence of the complaints and suggestions made by subscribers, took up seriously the question of the editorial and managerial conduct of this Magazine. By virtue of a Resolution, passed at the last meeting of the Committee, the editorship and the management have been transferred from old hands and entrusted to an industrious Sai Bhakta, Mr. G. W. Ghaisas, a retired Government servant, whose office address will be found on the first page of the cover. We hope that this new arrangement will, by the grace of Sai Baba, prove satisfactory and successful. Under these circumstances, now that new arrangements have already been made, It is needless to explain and go into details of the causes that led to the lapses of omission and commission referred to above, and the complaints

made by the devotees from different parts of India. The object of this publication has, from its start, been the spread of Sai Bhakti amongst the people at large by giving illustrations of " the high power" possessed and exhibited, in act and word, by Sai Baba during his mundane existence and through his preachings thus unfolded bring contentment to the minds of His devotees and lead them to practise higher spiritual life.

It must be confessed that there was recently a departure from this original ideal. To remedy this desideratum, the Sansthan Committee has approached certain well-known professors and religious teachers and enlisted their sympathy to help the editorial staff, by their contributions in English on matters spiritual on which they could speak with some authority. It is thus hoped that this arrangement will aid in augmenting the usefulness of this Magazine and increase the number of its subscribers and readers.

In this connection it may be mentioned that the Shirdi Sansthan had to suffer a loss of about Rs. 800 during the last two years in the publication of Sai Lila and this financial aspect could not be ignored by the Sansthan Committee, with the result that this Magazine pays its visit to its esteemed readers today in a renovated English cum Marathi garb.

In this English section we shall relate not only some of the manifestations of the inscrutable workings of Shri's high power in his life time but also those which have occurred since the Vijaya Dashmi of 1918 A. D. when Shri Sai brought his earthly existence to a cessation. Even today Sai Baba exists for his devotees though not in the physical form. The varied characters of His revelations in the hearts of men and women even to-day are indeed wonderful and are not confined to caste, creed or clime. None of the oldest devotees in Maharashtra could have imagined that He would appear in the Madras Presidency and an apostle of His cult would manifest himself in the person of the Tilak (the late Lokamanya) of Madras,

the now saintly Mr. B. V. Narasimhaswami, once a leading Advocate and self sacrificing valiant patriot. We apologise to Mr. Swami for this frank expresion we give to the feelings of Maharashtrian Sai Bhaktas about him, though we can well conceive that Mr. Swami would feel it very embarassing to have such an open tribute paid to him in his life time.

In this connection we recommend to our readers for perusal two books, one published by Rao Bahadur M. W. Pradhan, B. A. LL. B. J. P., Advocate, ( O. S. ) High Court of Bombay, and an Ex : M. L. A. entitled " Sai Baba, a Glimpse in Indian spirituality " and priced at rupee one, and another by the above mentioned Mr. B. V. Narasimhaswami, named " Introduction to Sai Baba of Shirdi, " which both chronicle the experiences realized by devotees of Sai Baba in the past.

As to the many recent experiences, we can mention here only two viz. the establishment of " The Shri Sai Baba Charitable Dsipensary" at Grant Road, Bombay, and the other the spread of Sai Bhakti in the Madras Presidency, of which Mr. B. V. Swami is the pioneer. Referring to the proceedings at the opening ceremony of " The Shri Sai Baba Charitable Dispensary, " who would not conclude that there must have been an ultra-human power that inspired ladies and gentlemen holding different-nay in some cases and respects even opposite views on matters social, political and religious, coming together on platform and helping with one voice to perpetuate the memory of the life work of the Saint of Shirdi, whose name the Institution bears. Our remark will be borne out when we tell our readers that Vir ( Hero ) K. F. Nariman the great Parsi Patriot, Mr. Jamnadas Dwrkadas, the reputed theosophist who presided, Dr. Mrs. Malinibai Sukthankar, Dr. K. R. Thakkar, Dr. Kaikini, and other eminent Doctors, and publicists-names well-known to readers of Indian Newspapers, took prominent part in the function and offered their voluntary services to the Dispensary. Similarly the superhuman powers of Shri Sai Baba reveal themselves in the establishment of Sai Bhakta Mandals in far away Ma-

dras Province, so different in language, social customs etc. from Shirdi, the place sanctified by Sai Baba by his residence and preachings. It is not therefore at all surprising that the Madras Bhakta-Mandals should have drawn within their fold and attracted to devout Sai Bhati, highly educated and cultured ladies and gentlemen following different avocations such as of lawyers, merchants, educationists, politicians and publicists. More in detail about the Madras, Bhakti Mandals and the Charitable Dispensary in our subsequent issues.

We conclude this short retrospect and prospect of "SAI LEELA" with the earnest prayer to Shri Sai Baba that He may in His providence bless this our new venture with success.

By order of the Shri Sai Baba Shirdi Sansthan Committee.

37, Charai Road'<br>Thana.<br>September 1939

S. N. Kharkar<br>Hony. Secretary

---

श्रीसाईमहाराज प्रसन्न:

# श्रीजोड शिर्डी येथील श्रीगुरुपौर्णिमेचा

## खर्चाचा संवत् १९९४, साल शके १८६० पैकीं तपशील.

| जमा | नांवें |
|---|---|
| ४६।= श्री समर्थाचे पेटी उत्पन्न | २७०९॥। |
| २८८॥।≡ वर्गणी भक्त मंडळीकडून आलेलीं रकमपैकी यादी अलग असे. | य॥ मुदबक खर्च एकंदर |
| १८०॥-।॥ श्री केशवराव भय्यासाहेब बुटी संथान सितावर्डी यांचे कडून झालेली झडती. | ३।≡ बेसन पीठ शेर २५ |
| | १४॥।= तांदुळ बारीक मण ९१९१ |
| ५१५॥।=।॥ | १८॥ गहूं मण ९२९१ |
| | १७९॥। तांदुळ ठोकळ मण ९२।.॥। |
| | १२॥।.॥। तुरीची डाळ मण ९१॥। |
| | १९≡॥ मीठ पायली ९॥। |
| | १२॥।- गुळ थेली नग ३ |
| | १।=हरबऱ्याची डाळ ९। |
| | २७।=॥ साखऱ्या पोत १ |
| | ४॥।-करडीचें तेल पीपा १ |
| | ६१९≡॥। तुप, पीपें, डबे, तीन ३ |
| | ॥- पीठीसाखर शेर २ |
| | ४॥ रवा शेर ३० लाडवाकरितां |
| | १९-॥ सुपारी शेर २॥ |
| | ॥- लवंग शेर ९९।. |
| | १९९= बदाम शेर १ |
| | ।- वेलदोडे |
| | ९≡ सेंगदाणा ९-॥ हिंग ९-॥ |
| | ॥=॥ साबुदाणा शेर ३ |
| | ९≡ भगर शेर १ |
| | ॥= जीरें शेर १ |

| जमा | नांवे |
| --- | --- |
| ५१५।।।=।।। बेरीज | ०=।। धणे शेर १ |
| | ०–।। काल शेर ०– |
| | ।।= चीच शेर ४ |
| | ।॰ आंबसूल १ शेर |
| | ०– संदेव ०।। मीरी ०।। |
| | ०=।। मयदा |
| | ०= खजूर |
| | ०≡।।। नारेळ नग ५ |
| | ०=।।। खडी साखर |
| | ।– खोबरे १। शेर |
| | ०≡ किसमीस १ पाव |
| | ०।। खारीक मोहरी ॰।॰ |
| | ८०।।। दुधम्हैशीचे |
| | ५।=।। शाकभाजी |
| | ।।।≡।। कपडा |
| | २।= दही |
| | ९।= काष्ठ |
| | १।॰।। फराळ खर्च |
| | २।।।= चहा अम्बरटीपस |
| | ६।।।= पत्रावळी २५०० द्रोण ३००० |
| | २।–॥ मसाला |
| | ४० आचारी |
| | २।। कसोदी ५ पासरी |
| | ।।= हळद पीसलेली ०–।। |
| | ।– पांन विड्याचें |
| | २७००।।। |
| | १०।॰।।। रोषनाई खर्च |
| | ८।।= घासलेट डबे ३ |
| | ०=।।। आगपेटी डझन १ |
| | १।। मैंवल नग १२ |
| | १०।॰।।। |
| | २३।०। धर्मदाव खर्च |
| | ९।।=। देवधामी खर्च |
| ५१५।।।=।।। | १३।।= इनाम खर्च |



| जमा | नांवे |
| --- | --- |
| ५१५।।।=।।। बेरीज | १७।।≡।। फिरकोळ खर्च |
| | १६।। ब्यॅंड बाजा १५ तासे. १।।. |
| | १८०≡ मजुरी धान्य पिसाई |
| | ५१।।= रेल्वे टिकट खर्च |
| | ८।– मोटार लारी व टांगा खर्च |
| | १।॰।। चीलर खर्च कमीशन वगैरे |
| | १।।≡।। हमाली खर्च |
| | ०–।। नदी उतारी |
| | १७।।= पुजेबद्दल सामान |
| | ०= गुलाल बुक्का |
| | ।।= कापुर |
| | १। कवडया उद |
| | ०≡।। उदबत्ती |
| | ।।= तेल सुवासीक |
| | १४।। पामरी समाधीवर |
| | ०=।। लाह्या |
| | १७।।= |
| | ९६।।।≡ प्रसाद खर्च |
| | ५६।।–।। चौटनवीश मात खर्च |
| | ७। कव्हरें १००० छापविले |
| | ९।= आमंत्रण पत्रीका छपाई |
| | ३४।।–।। पोस्टेज खर्च |
| | ५।= लेबलें प्रसादांकरितां |
| | ४०।= प्रसाद पाठविण्याबद्दल खर्च |
| | माता बाळा गुरव |
| | २९।।।=।। पोष्टेज |
| | ३ कापड पिवशाबद्दल |
| | २।। पिवशा शिलाई |
| | १०= सुंठ ०१ शेर |
| | ३।≡ साखर १२।। शेर |
| | । रील दोरा |
| ५१५।।।=।।। | ०=।। रद्दी |
| गोविंद बाळाजी लांडे गुंग १३-९-३८ | ५१५।।।=।।। |

# श्रीगुरुपौर्णिमेबद्दल वर्गणी आलेली रक्कम

## शके १८६०

### श्री. खारकर प्रांत वसूल माल वसुल

| रक्कम | | नांव | ठिकाण |
|---|---|---|---|
| २ | श्री. | हरीलाल माणकिलाल डाहणूकर | बडोदें |
| १ | ,, | पार्वतीबाई गडकरी | माटुंगा |
| १ | ,, | पांडुरंग सखाराम धम | दादर |
| १ | ,, | सदाशिव विश्वनाथ देव | पेंढ |
| ५ | ,, | मोरेश्वर हरी कर्णीक | डहाणू |
| ५ | ,, | सिताराम विश्राम तोडणकर | दादर |
| १ | ,, | काशीनाथ रा. आंजर्लेकर | दादर |
| २ | ,, | पुरुषोत्तम कृष्ण सामंत | घाटकोपर |
| ३ | ,, | काशीबाई कानीटकर | पुणे |
| ३ | ,, | टी. एस. रामचंद्र आयर | वाली पलयम |
| १-४ | ,, | रामचंद्र वामन पाटणकर | आलीबाग |
| ५ | ,, | गो. कृ. सांडू | चेंबूर |
| २ | ,, | एस. बी. मशापुर | मुंबई |
| १ | ,, | सखाराम कृष्णाजी वैती | खोचिवडें |
| १० | ,, | डॉक्टर के. व्ही. साठे | गिरगांव, मुंबई |
| २ | ,, | खंडेराव अनंत जुव्हरकर | बडोदें |
| २ | ,, | जी. एस. कोठारी | ग्वाल्हेर |
| १-४ | ,, | के. ए. पंथकी | सांताक्रुझ |
| १ | ,, | वासुदेव पुतळाजी देसाई | ठाणें |
| २ | ,, | किल्हीमकर, चरई | ठाणें |
| ५ | ,, | डॉ. छोटालाल भुलाभाई भट | मेहमदाबाद |
| १-४ | ,, | रामचंद्र लक्ष्मण मेकडे | तळें |
| १-४ | ,, | श्रीमती पारुबाई गणपत तलावकर | वसई |
| १-४ | ,, | शामराव भास्कर कंटक | मुंबई |
| २-८ | ,, | गंगुबाई किन्हीकर | जळगांव |

| रक्कम | | नांव | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री. | गो. ल. फणसे | कल्याण |
| १ | ,, | पु. रा. ओक | जळगांव |
| २ | ,, | गणेश केशव रेगे | इंदूर |
| ०-८ | ,, | सरस्वति बाई पाठक | ठाणें |
| १ | ,, | सुशीलाबाई दातार | ठाणें |
| १ | ,, | गो. भा. दातार | ठाणें |
| ५ | ,, | एस. आर. खोपकर | आमरेली |
| ३ | ,, | बी. व्ही. करंडे | मुंबई |
| १-४ | ,, | सुशीला बाई वसंतराव गोरक्षकर | सांताक्रुझ |
| १-४ | ,, | शेट दोराबजी डी. ताडीवाला | दादर. |
| २ | ,, | एम्. बी. गुप्ते | ठाणें |
| १ | ,, | श्री. पी. एस. जोशी | माहीम |
| १ | ,, | एम्. ए. पुरंदरे | चिंचणी |
| २ | ,, | जी. व्ही. आरस | कठोद |
| २ | ,, | वाय. व्यंकटराव | मद्रास |
| १ | ,, | व्ही. जी. भोलागीर | हैद्राबाद ( दक्षिण ) |
| २ | ,, | सुधा विजयनाथ चौणकर | बोरिवली |
| ५ | ,, | महादेव शिवाजी महाजन | मुंबई |
| १-४ | ,, | सुंदरलाल दिनानाथ नवलकर | मुंबई |
| १० | ,, | राजाराम निळकंठ चौबळ | सिकंदराबद |
| ५ | ,, | मथुरादास हरजिवनदास | अंकलेश्वर |
| १ | ,, | विष्णू गोविंद देव | संगमनेर |
| १ | ,, | पितांबर कचरा | संगमनेर |
| १-४ | ,, | गोविंद विनायक मोडक | दादर |
| १-४ | ,, | सोनाबाई नाडकर | माहीम |
| २ | ,, | नागेश वासुदेव गुणाजी | बेळगांव |
| २ | ,, | डी. पी. नायडू | पुणें |
| २ | ,, | नारायण बाळकृष्ण पोरें | चौल. |
| १ | ,, | मोरेश्वर विष्णू जोशी | टेंबरगांव |
| १ | ,, | लक्ष्मण मोरेश्वर तेंडुलकर | मुंबई |
| ३ | ,, | जी. एम्. विजयकर | मुंबई |

| रक्कम | | नांव | ठिकाण |
|---|---|---|---|
| ५ | श्री. | डी. एन्. परुळकर | यवतमाळ |
| ३ | ,, | मोरेश्वर महादेव कोलंगडे | भुसावळ |
| १० | ,, | दत्तात्रय नारायण गुरुजी | बडोदें |
| ५ | ,, | मारोती भीकाजी पंडित | तुरंबव |
| १० | ,, | दत्तात्रय सिताराम ओक | नाशीक |
| ५ | ,, | रामचंद्र आत्माराम दोंदे | कराची |
| १ | ,, | रघुनाथ डी. रेगें | कुडाळ |
| १-४ | ,, | भीकाजी महादेव भोरटकर | पुणें |
| १-४ | ,, | दत्तात्रय गोविंद पांढरे | पुणें |
| ५ | ,, | श्री. विठ्ठल रखुमाबाई मंदीर | चुंचोळे |
| ५ | ,, | वामन सांबाशेट केसकर | बांदा |
| ४ | ,, | नारायण पुंडलीक सुतार | बांदा |
| २ | ,, | मेघशाम बाळकृष्ण भांगले | बांदा |
| ५ | ,, | श्रीमती दुर्गाबाई देशवंडकिर | जळगांव |
| १ | ,, | चिंतामण आनंतराव चित्रे | वांद्रे |
| ३ | ,, | ग. कृ. खासगीवाले | पुणें |
| १-४ | ,, | के. आर. खंडकर | देवास |
| १-४ | ,, | एस. एस. कर्णीक | शालीबाग |
| १ | ,, | बी. आर. नंजुनडीया | वेन्हामपूर |
| ५ | ,, | दाजी विठ्ठल सांबारे ता. २२-६-३८ | विलेपार्ले पूर्व |
| १ | ,, | सौ. सिताबाई राजाराम वालावलकर | दादर ता. १-७-३८ |
| २ | ,, | रा. सा. यशवंत जनार्दन गाळवणकर | वांद्रे २-७-३८ |
| १-१० | ,, | रा. सा. त्रिंबक बळवंत चित्रे | दादर |
| १-४ | ,, | श्री. गोविंद अमृतराव मुळें | मोगललेन, माहीम मुंबई |
| २-४ | ,, | आनंदराव परशराम डोळस | कांदेवाडी |
| १ | ,, | यशवंत शामराव दिघे | कांदेवाडी |
| १ | ,, | बाळकृष्ण राघों सावंत | वांद्रे |
| १-४ | ,, | सुरेंद्र शामराव जयकर | विलेपार्ले पूर्व |
| १ | ,, | ज. रा. दळवी | वसई |
| १४ | ,, | वासुदेव सिताराम सामंत | मालवण |



| रक्कम | | नांव | ठिकाण |
|---|---|---|---|
| ४ | श्री. | बी. एम. मानकर | वांद्रे, जरम्याशन |
| २ | ,, | सदाशिव भीकाजी दळवी | विलेपार्ले पूर्व |
| १-४ | ,, | चिंतामण रामनाथ सातघरे | वांद्रे बझार रोड |
| २.४ | ,, | वा. ना. पाटकर, हायकोर्ट जज्ज | बडोदें, सयाजी गंज |
| २-८ | ,, | पाडुरंग जयराम मंत्री | मुगभाट लेन, मुंबई |
| १-४ | ,, | दत्तात्रय आनंदराव पितळे | फणसवाडी, मुंबई |
| १-४ | सौ. | सुभद्राबाई पांडुरंग म्हात्रे | आंधेरी ता. ९-७-३८ |
| १-४ | ,, | लक्ष्मीबाई मुकुंदराव पाटील | ,, |
| १-४ | श्री | विनायक आपाजी वैद्य | ,, |
| ०-४ | ,, | लक्ष्मण बाळकृष्ण सोनटक्के | ठाकुरवाडी, मुंबई |
| २ | ,, | विश्वनाथ मो. कोठारे | गिरगांव मुंबई |
| १ | ,, | ए. जी. तळपदे | वांद्रे, सोमनाथलेन |
| ०-४ | ,, | गोविंद शि. कारखानीस | वांद्रे बझार रोड |
| १ | ,, | विष्णू. बा. साने | पापडी. वसई |
| ५ | ,, | गणेश अनंत कोनकर | बरजिरीया चौदार |
| १-४ | ,, | डो. व्ही जी. गरुडें | २० लक्ष्मी निवास शिवाजी पार्क मुंबई १६ |
| ५ | ,, | भाऊ आबाजी वैद्य | लक्ष्मी बिल्डींग, गोखले रोड, दादर |
| ५ | ,, | दादाजी गोपीनाथ जोशी | राम मारुती रोड, दादर |
| | | हस्ते र. भा. पुरंदरे. | |
| १ | श्री | केशव रामचंद्र फरताळे | पुणे |
| १ | ,, | धोंडबा रामचंद्र ,, | पुणें |
| १ | ,, | शंकर बाळोबा लखापदे | पुणें |
| ५ | ,, | गोवर्धन गीरधारी | ठाणा |
| १ | ,, | नारायण भालचंद्र मराठे | नागपूर |
| १ | ,, | शांताराम बळवंत वाचपे | कुले |
| १ | ,, | गंगाधर मोरेश्वर सुगवे | दरकुले |
| १ | ,, | पांडुरग विठ्ठल सावणेकर | कुरले |
| १ | ,, | सावळेराम आत्माराम सीरोळकर. | कुरले |
| १ | ,, | विश्व कृष्णाजी सीरोळकर | कुरले |
| २८८॥≡ | | एकंदर वर्गणी | |

श्रीसाईबाबा

# श्री शिर्डी संस्थान गोकुळअष्टमी उत्सव

## शके १८६० चा हिशेब

### जमा

२५ श्री. श्रीधर नारायण खारकर (श्री. शिर्डी सं. ऑ. सेक्रेटरी-साहेब) यांचे कडून ता. ७ ८-३८

६-५ श्री. श्रीधर ना. खारकर सेक्रेटरी साहेब यांचे ता. १२-७-३८ चे पत्रावरून जमा

-५ श्रीदत्तात्रय महादेव कुळकर्णी पेपरिया मॅन्शन, पोष्ट ऑफिस जवळ, मालाड.

५ श्री. वामन कृष्णाजी औरंगाबादकर, ३ री मोदीलेन, खांडवा सी. पी.

१ श्री. बाबाजी आनंदराव माहिले, कृष्ण पाटलाची चाळ, मु. पो. पालघर जि. ठाणे–

६-५

१-१५-६ तांदुळ उत्सवातील शिलक राहिलेले बद्दल रोख जमा. एक साडे पंधरा आणे.

३३-४-६

### नांवें

२४-७-३ नवलमल मारवाडी, दु. राहाते, सामान खरेदी.

१७ तांदुळ गोण २पा २६

३- ३ तुरीची डाळ पा. ६

२- २ तुप २

६-६ आमसुल अर्धा शेर, २ आणे ६पै तीखट अर्धा शेर ४ आणे,

९ खोबरे एक शेर, ४॥ आणे, साखर १ शेर ४॥ आणे

२ वेलदोडे १ तोळा १ आणा, हळद १ आणा,

-९ जायफळ ·।- आणा, खसखस -॥- आणा,

३-६ हिंग २ शेर १॥ आणा गुलाल -।- शेर २ आणे

५ नारळ ५, ३॥ आणे सुंट २ शेर १॥ आणा

९ हिंग ·॥-, मोहरी ८।· आणा

१-९ जीरें -।- आणा मीठ १॥ आणा

२४-२-३



### जमा

३३-४-६ मागील बेरीज

३३-४-६ बेरीज

### नांवे

२-११-९ पनालाल मारवाडी, शिर्डी,

१२-३ चहापुडे ३ ३॥ आणे, साखर २ शेर ८॥ आणे

१२ गरम मसाला ८॥· १२ आणे शेर,

५-९ मीठ १ शेर, गोडे तेल १ शेर, ·।-आणे

११ गुळ ३ शेर ५ आणे कुरमुरे २ शेर ३ आणे

२-९ काथ्या ८॥· २॥, आणे

२-११-६

१-१३- सर्पण १ रु ५ आ. दुध १ शेर ४ आणे

-१४- वारनीस डबा १ १४ आ. रथास रंग देण्यास

८ कारभारी माळी सैंपाक मजुरी

८ नाना चोपदार, स्वयंपाक मजुरी

४ नाथा ब्राम्हण पाणी वाहण्याबद्दल

५ सोनीबाई भांडीं घासणे वगैरे मजुरी गडी १

१२ अभिषेक स्नान दही वगैरे

१-६ प्रसाद पाठविणे खर्च पोष्टेज

१ तुपाबद्दल रोख दिले. एक रुपया

३३-४-६

# गोकुळअष्टमी-उत्सव

१ श्रीगोकुळाष्टमीचा उत्सव तारीख १८-८-३८ रोजी गुरुवार पासुन रात्रौ नेहमी प्रमाणें गुरुवारचा श्रींचे पालखीचा सोहळा झाल्यानंतर श्रींचा जन्मउत्सवाचे कीर्तनास सुरवात झाली. बरोबर बारा वाजतां श्रींचे समाधीवर गुलाल, फुलें वगैरे उधळून कीर्तन समाप्त झालें.नेहमीप्रमाणे शेजारती होऊन मग तीर्थ प्रसाद अवघ्या मंडळीस वाट-ण्यांत आला. नंतर रा. शंकरराव पवार, मु. सातारा, यांचे व श्रीयुत दत्तात्रय रासने श्रीयुत संस्थानचे गवई विठ्ठलराव मराठे यांचेंही संगीत गायन झालें. नंतर चहापान होऊन समारंभ आटोपला असें.

२ श्रींचे समाधीस उत्सवाप्रित्यर्थ अभिषेक तारीख १९-८-३८ रोजीं सकाळीं झाल्यावर श्रीस अभ्यंग स्नान, त्यानंतर श्रींची आरती होऊन मग भोजन समारंभास प्रारंभ झाला. भोजनास अजमासें सर्व जातीची मंडळी सुमारें ४००/५०० पान झालें. भोजनास आमटी भात करण्यांत आला. याचा सर्व बंदोबस्त ब्राम्हण मंडळीचे पुढारी श्रीयुत माधवराव सहस्त्रबुद्धे व श्रीयुत दत्तात्रय दामोदर रासने मु. पुणें यांनीं उत्तम रीतीनें ठेविला असे. व स्वयंपाकास रा. सगुणराव यांनीं मदत केली असे. त्यानंतर रात्रौ श्रींचे रथाची मिरवणुक झाली.पुढें श्रींची शेजारती झाली.नंतर शिर्डीच्या बनुबाई, सोनाबाई यांचें श्रींचे मठीपुढील खुल्या जागेंत संगीत गायन झालें. त्यानंतर चहापान समारंभ आटोपला, या सर्व उत्सवाचे कार्यक्रमास श्रीयुत तात्याजी गणपतराव पाटील कोतें, मु. शिर्डी व त्यांचें थोरले पुत्र बाजीराव पाटील होते.

३ श्रींचे पुढें काल्याचें कीर्तन झालें. कीर्तन संस्थानचें गवई विठ्ठलराव मराठे यांनीं केलें असें. नित्या प्रमाणें श्रींची आरती होऊन नंतर तीर्थ व दहीकाल्याचा प्रसाद वाट-ण्यांत आला असें. येणें प्रमाणें श्रींचा उत्सव पार पडला असें—तारीख २०-८-३८

आपला चरण रज,

तात्याजी गणपतराव कोते

ता. १-९-३८

श्रीसाईबाबा

——:०:——

# श्री. ल. दा. बा. चि. वाचनालयवृत्त

१ वाचनाल्यांत नवीन उपक्रम ता. ४-१०-३८ पासून म्हणजे शेरे बुक यांत जे शेरे दिले असतील ते दर महिन्यास ऑ. चिटणीस यांना कळविणें.

२ वाचनाल्यांत दररोज किती लोक येऊन वाचनालयाचा फायदा घेतात व एकंदरीनें खेंडेगावाचे मानानें वाचनाची गोडी किती लोकांस लागली, हें कळावें म्हणून ता. १-१-३९ पासून एका वहीवर वाचनाल्यांत येणारे लोकांच्या सह्या तारीखवार घ्याव्या व त्यावरून सरासरीनें किती लोक दररोज वाचनाल्यांत येतात याची कल्पना येईल. म्हणून हा उपक्रम सुरू करावा किंवा कसे याबद्दल कळविण्यास विनंति आहे.

१ शेरेबुक नक्कल ता. ३।१०।३८ विजयादशमीं श्रीसाईनाथ लक्ष्मी दामोदर बाबरे चिंचणकर वाचनालय ( संस्थान शिर्डी ) या संस्थेंत आज सुमुर्तावर श्री. रा. रा. बाळासाहेब देव, विश्वस्त, या बाबांच्या भक्त श्रेष्ठांचे हस्ते श्रीसरस्वती पूजन यथाशास्त्र व यथासांग झाले. या सुप्रसंगी सदर समारंभास गावांतील स्त्री पुरुष जमा होऊन, मंगलवाद्यासहित व परगावाहून आलेल्या श्रींचे भक्त मंडळी समवेत हा कार्यक्रम श्रींचे कृपेनें थाटानें पार पडला. या वाचनालयात ऐतिहासिक, धार्मिक, पारमार्थिक व भक्तिपर ग्रंथ आहेत. या वाचनालयात श्रीसाईलिला, साहित्यसंग्रह, व ज्ञानमंदिर अशी मासिकें व दैनिक ज्ञानप्रकाश येत आहेत. वाचनालयाची जागा प्रशस्त हवाशिर व स्वच्छ अशी आहे. गावांत या संस्थेनें पारमार्थिक वगैरे ग्रंथ वाचनाची अभिरुचि खास होईल. ही संस्था फार उपयोगी व लोकादरास पात्र आहे. श्रींचा भक्तवृंद फार मोठा आहे. त्यानी वाचनाल्यास स्वतः अगर इतरांकडून ग्रंथांची मदत केल्यास ही संस्था नमुनेदार होईल. येथील व्यवस्था वाखाणण्यासारखी आहे.

गोपाळ भास्कर दातार

वकील. ठाणें

ता. ३-१०-३८

श्री.

(२) मी शिर्डीस पुण्यतिथी उत्सवानिमित्त पांच दिवस मुक्काम केला.परिस्थानेंच या स्थळी आल्यामुळें सर्व गोष्टीकडे साहजिक बारकाईनेच पाहात होतो. येथें वाचनालयाची सुद्धां सोय आहे व ती सुव्यावस्थित आहे, हे पाहून फार समाधान वाटले. येथें येणाऱ्या सर्व मंडळींनी त्याचा अवश्य उपयोग करावा. या संस्थेमध्यें विशेषतः धार्मिक ग्रंथ ठेवण्याची जरूरी आहे, तरी ज्या कोणाजवळ अशा प्रकारचे जुने ग्रंथ, पोथ्या, पुराणें वगैरे देण्यासारखे असतील त्यांनी अवश्य द्यावे.

ता. ९ ऑक्टोंबर १९३८ गणेश पांडुरंग कारखानीस, ठाणे.

श्री.

( ३ ) येथील लायब्ररीची व्यवस्था पाहून मनाला फार आनंद झाला. व्यवस्था उत्तम आहे.

प्रो. ग. गो. नरके पुणें.

ता. १२-१०-१९३८

श्री.

(४) आजरोजी येथील संस्थानची लायब्ररी पाहिली.हें स्थान भक्तीमार्ग वाढविण्याचें असल्यानें लायब्ररींत पारमार्थिक ग्रंथाचा बराच मोठा भरणा आहे; हे उचित होय. तथापि ह्या ठिकाणी येणारे भक्त केवळ पारमार्थिक बुद्धीनें येतात असें म्हणतां येत नाहीं. श्रीसाईबाबांच्या दर्शनानें होणारा आनंद लुटावा हीच भावना प्रधान असते. तरी सदरचे लायब्ररीमध्यें ज्या पुस्तकांच्या वाचनानें सर्व साधारण जनतेला आनंद वाटेल अशा पुस्तकांचा संग्रह ठेविल्यास ही संस्था येथें येणाऱ्या स्त्रीपुरुषांस आपला येथील वास आनंदांत काढण्याला पुष्कळ प्रकारें उपयुक्त होईल असें मला वाटतें. तरी कित्येक पौराणिक अथवा सामाजिक नाटकें, कादंबऱ्या व थोर पुरुषांची चरित्रें अशा पुस्तकांचा संग्रह लायब्ररींत व्हावा असें माझें मत आहे. व हें कार्य भक्तजनांच्या सहानुभूतिपर, देणग्यावर अधिक सुकर होईल, तरी मी देणगी दाखल १ रुपया एक लायब्ररी करितां देत आहे, तरी स्वीकार होईल अशी विनंति आहे.

दामोदर रामकृष्ण बापट

पेन्शनर एज्यूकेशनल इनस्पेक्टर

राहणार मु. आंजर्लें.

ता. दापोली, जि. रत्नागिरी. ता. १२।१०।३८

(५) पी. एन्. दारुवाला बारिस्टर, मुंबई.
बी. ए. एल. एल. बी. ता. २१।१०।३८

यांचा शेरा इंग्रजींत आहे व बराच मोठा आहे. शेरा चांगला आहे.

आपला नम्र सेवक,

विठ्ठलराव

---

# श्री. ल. दा. बाबर वाचनालयवृत्त

मागील इंग्रजी शेरे सोबत ( नक्कल ) जोडली आहे.

एकंदर शेरे पांच ५ आहेत.

चालू महिन्याचा शेरा ता. ९।२।३९

श्रीसाईबाबा संस्थानच्या मार्फत चालविलेली लायब्ररी गेल्या वर्षापेक्षां आतां ग्रंथांचा भरणा जास्त आहे. या लायब्ररीमुळें संस्थानच्या मंडळीस उपयोग आहेच, पण येणाऱ्या भक्तांस तसेच या गांवच्या रहिवाश्यांना ज्ञानाचें उत्तम साधन आहे. धार्मिक व सामाजिक पुस्तकें असून वर्तमान पत्रांमुळें जगांतील घडामोडीकडेही खेडेगांवांतील मंडळीचें लक्ष लागतें. या लायब्ररीस थोडी थोडी मदत मिळाल्यास चांगले ग्रंथ समुह करण्यास सुलभ होईल. श्रयुित विठ्ठलराव यांनीं व्यवस्था चांगली ठेविली आहे. मदती दाखल एक रुपया देत आहे.

नागेश आत्माराम सावंत,
पो. स. इनस्पेक्टर, मुंबई.

आपला नम्र,

विठ्ठलराव मराठे.

# ता. १-३-३९ मागील इंग्रजी शेरेबुकाची नक्कल

Opinions of the Visitors to the Shrine of Shri Sai Baba, shirdi, as copied from the Library Register.

It has filled my heart with great bliss to have given me an opportunity to pay my namaskar to the shrine of Sai Baba the saint and uplifter of erring humnity. The place is full of the messages of the life & teaching of the saint. There are points all around the shrine where saint did wonderful work of uniting all classes of men & women in raising the standard of devotion in service & uniting men of all religions as brothers & women as sisters. The place is well kept & the inmates are very careful to show the different objects which have reference to the life & work of that great servant & master of humanity.

The library contains books that show the deep impression that has been created on the minds of those, his who had come in contact with the saint in life time & the stories and incidents of the life are treasured up & are narrated with great raptures. I wish the Committee of this Holy shrine every success and congratulate the member wfor the great care & trouble in keeping this sanctuary a veritable house of God for uplifting & inspiring pilgrims to lead life of service & sacrifice. Wishing the Holy shrine renewed prosperity. I remain,

Your devoted pilgrim

Bombay. 21-19-38. (sd.) P. N.Daroowalla. Bar. at. Law.

—2—

It is with great pleasure I have to write these few lines.. I came here as a devotee of Sri Sai Boba, about whom I heard for the first time two years back, and since then I was offering my prayers to him. Suddenly it struck into my mind to have a Dharshan of his Samadhi, & started from Trichinopoly on the 30th. Dec. 38 & at Madras Sri B. V. Narsinhaswamy, on whom I called to find out the route, gave me full information about the route & also a short history about the place. I arrived here on sarturday the 7th inst. at about 7 P. M. by bus from Poona. The chief clerk with his assistants welcomed my arrival & gave me every assistance

during my stay here for two days & in arranging for the Abhishe. kem & Archanai of Sri Sai Baba. I am very much impressed with the Bajan & the usual Poojas, which are all done in a systematic way & most sincerely by one & all the staff here. After a stay of two days here, I wish very much to go here at least once in three months to have the great Sage's Dharsan and have his blessings. The Poojari does his routine work very well. May Sai Baba give them the strength and health to carry on their duties sincercly for many many years to come. I have also seen the Library and there are several useful books & Mr. Vital Rao took me round to this place.

A sincere & divoted Bhakta from Trichinopoly, S. India.

D. 9-1-39. (sd.) A. S. Gopalakrishnan.

Proprietor, A. S. Gopalakrishnan & Co. Engineers. Contractors, Managing Agents, The karaikkal Electric Supply Co. Ld.. West Bonbard Rd., Trichinopoly.

—3—

I came from Masulipatam, from the East coast of the Madras Presidency. Although Sri Sai Baba entered Samadhi nearly 20 years ago nothing of him is known in the Madras Presidency till now. Some 2 months ago I had by chance gone through a Telugu publication by name Sri Sai Lila by R. S. B. Papagga Sresh, a copy of which was sent by Mr. B. V. Swamy to one of his friends at Bazwada for circulation. As soon as I got through the book, I was struck with the rare powers of Sri Sai Baba, narrrated through reminixces given by well known respectable persons. I at once made up my mind to pay a visit to Shirdi to have some first hand information. I corresponded with Mr. B. V. N. Swamy, who kindly sent me some other book abont Sai Baba, which he is just publishing & by his further correspondence roused my interest still further to pay a visit to Shirdi. So I started for Shirdi on the 8th inst. with all my family members (9 members) inculding ladies & children. On my way I passed through Pandharpur, Bombay, Nasik and finally reached Shirdi on the 18 th inst. On my way through Bombay, I met Mr. S. N. Kharkar, Hon. Secretary of Sai Sansthan residing at Thana & got some further particulars about shirdi. I also visited R. B. M. W. Pradhan at Thana. We are all Telugu speaking people & there are none at

Shirdi who can speak our language, nor can we understand Hindi or Marathi. still we are all quite at home & felt no inconvenience whatsoever. The Establishment in the Sai Baba Asram is very obliging to all & everyone who goes there. The daily Puja is very impressive, inspiring & touching & not merely formal as at other places. The Samadhi, the Mosque & the Library are all kept very neat & clean. The Library contains several Marathi volumes contairing stories about Sai Baba. To make the Library useful to all it should be provided with some English as well.

D. 19.1-39. ( sd. ) S. VENKATARATNAM.

Retired P. W. D. Asst Engineer. Masulipatam, Kistna Dt.

—4—

I have visited the Sai Nath Baba's Shrine along with my parents & family on the 17 th & our visit will not be in vain. We could see & hear some of the actual scenes and the wonderful achievements of Sai Baba, in person from some of those who were in actual touch with Sai Nath. The place is impregnated with the Leela of Sai Baba & every one of the Shirdi people is a Bhakta in the real sense. We are glad to be able to mix ourselves with them. in the praises, Bhajans, Poojas, etc. performed regularly for the Sai Baba. The Library which we have visited contains several Marathi books. Although we of the Telugu Districts cannot understand anything from the books, I hope it will contain all varieties of books and become an all India Institution.

D. 20-1-39 ( sd. )S. Hanumantha Aire. L. M .& S.

Medical Practioner, Masulipatam.

—5—

I have visited the Shrine of Sri sai Baba & remained for a week. I found the members of the Sansthan attending to the prayers regularly & systematically. They are courtious & kind to the visitors. The garden, the library & other institutions connected with the sansthan are being attended to carefuly & kept neatly. to Sri Sai Baba that this institution may grow from day by day & spread the teachings to all of the Humanity irrespective of caste, creed & nationatity.

D. 7-2-39
Head Draftsman
P. W. D. Bellary

( sd. ) C. V. Natesa Naickr,
P. W.D Madras.

कै. श्रीसंत भाऊमहाराज



श्री मंगेश प्रसन्न

# अनुभव

सबंध आयुष्यांत एकच वेळ, पुरे चोवीस तासही नव्हे, अशा त्या वेळेची आठवण झाली म्हणजे, हृदय कसें अगदीं आनंदानें भरून येतें.

सन १९११ सालची गोष्ट. त्यावेळीं मी बोरिवली येथील प्रसिद्ध माडगांवकरांच्या स्थावर इस्टेटीवरील देखरेखीचें काम पहात असें. कै. बळवंतराव रामचंद्र उर्फ बाळाभाई माडगांवकर यांनी मला एक दिवस "गोव्याला सोनकेवडे चांगले मिळतात नाही?" असें विचारलें त्याला होय, त्याचा वर्षातून एकदांच हंगाम असतो, आणि त्यावेळीं ते चांगले मिळतात, असें सांगितलें. त्यावर वांद्रयाचे १ ला वर्ग मॅजिस्ट्रेट दाभोळकर यांनीं तुम्हाला सांगून ते पैदा करण्यास सांगितलें असून तुम्ही जर ते त्याना आणून द्याल, तर त्याना फार आनंद होईल. कारण त्यांचे गुरु शिर्डीचे सांईबाबा यांना त्यांचा वास दिलेल्या कातगोळ्या (Cafechu) फार आवडतात. यासाठीं त्यांचे हें काम कराच; असें सांगितलें. त्याप्रमाणें एका आठवडयाचे आंत आणून मी त्याना पोंहोचते केले. अर्थातच त्याना फार आनंद झाला. आणि त्या दिवसापासून पूज्य कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांची मला ओळख झाली, आणि पुढें पुढें तर ते माझ्याशीं फार सहानुभूतीनें वागूं लागले. एवढे मोठे अंमलदार आणि त्यांचा त्या अधिकाराला साजेसा त्यांच्या ठिकाणीं भारदस्तपणा, रुबाब असून सुद्धां माझ्यासारख्या यःकश्चित माणसाकडे त्यांची वागणूक फारच प्रेमळपणाची असे. या त्यांच्या वागणुकीमुळें अजून मला कृतज्ञतेनें भरून येतें. परमेश्वरी योगायोग काय असेल तो असो. एके दिवशीं मला त्यांची बोरिवली स्टेशनवर गांठ पडली. त्यावेळीं त्यांना काय स्फुर्ती झाली, आणि जवळ उभे असलेले भणसाळी वाणी जातीचे व्यापारी गृहस्थ त्यांचे स्नेही, त्यांना हाक मारून जवळ आणून, "तुम्ही ज्या वेळीं शिरडीला जाल त्या वेळीं या वागळयाना अगत्य घेऊन चला," असें सांगितलें. तें ऐकून मी चकीत झालों आणि कां! रावसाहेब आपण एवढी तसदि घेतलीत, मला तिकडे जाऊन काय करायाचें आहे? मला तिकडे जाऊन त्यांच्या कडे काहींच मागायाचें नसून त्याना त्रास द्यायाचा नाहीं. त्यावर काहीं हरकत नाही पण तुम्ही जाच" हेच शब्द त्यांचे बाहेर पडले. बरें आहे रावसाहेब, पाहुं. असें म्हणतांच त्यांची गाडी सुटली. पण मागाहून त्यांच्या त्या हुकमी शब्दांची मनाला एक सारखी टोंचणी लागून राहिली. एक दिवस श्री. दामोदर रघुनाथ ठाकूर, बोरिवली, यांजकडे बसलों असताना सहज ही घडलेली हकीगत त्याना सांगितली. तें ऐकून त्याना

आनंद झाला आणि त्यावर त्यानी " दाभोळकर साहेब असें कोणाला सांगणारे इसम नसून त्यानी जर मुद्दाम तुम्हाला असें सांगितलें आहे, तर, तुम्ही अवश्य जावें " असा त्यांचा अभिप्राय पडला. पण हें प्रकरण तेवढयावर संपलें नाहीं, तर त्यांची मुलगी आणि नातवंड तिकडेच होतीं. त्याना मोठा हर्ष होऊन त्या सर्व मंडळीनें, एकदम वागळे साहेब तुम्ही शिर्डीला जाल तर आमचें आप्त आम्हाला मिळतील अशी आशा प्रगट केली.

सदर श्री. ठाकूर यांचे जामात श्री. पांडुरंग सखाराम नेरेकर मु. वसई हे गृहस्थ आपल्या सर्व मुलें माणसाना सोडून दोन वर्षें पर्यंत तिकडेच राहिले होते. अर्थात आतां पर्यंत तिकडे जाण्याबद्दल जो अनिश्चितपणा होता त्याला या वरील प्रकारामुळें परिस्थि-तीनें आपोआपच निश्चितपणा आणला. झालें, त्या सालच्या डिसेंबर महिन्यांत मालका-कडून घरी गोव्याला जाण्याची परवानगी घेऊन क्रमाप्रमाणें मुंबईला श्री. बस्तोडकरच्या बिऱ्हाडी आलों. तिकडे आमचे एक हितकर्ते मित्र पांडुरंग अनंत केंकरे, नावाचे गृहस्थ गोव्याचे विद्यार्थी, कॉलेज मध्यें B. A. चें क्लासांत होते. त्याना आणि सध्या मुंबईंत प्रॅक्टीस करीत असलेले डॉ. नारायण रामचंद बस्तोडकर हे त्यावेळीं तिसऱ्या वर्षाचे परि-क्षेंत, एकदां मागें आले होते, या दोघांनाही माझा शिर्डीपर्यंत जाण्याचा निश्चित विचार कळविला. पण त्यांनीं कांहीं एकदम मान्यता दिली नाहीं. तरी पण त्या दिवशींच्या रात्रीं आठ वाजतां सुटणाऱ्या कलकत्ता मेलनें जाण्याची मी तयारी केली. योग्य वेळीं बोरिबंदर स्टेशनवर जाण्यास निघालों त्यावेळीं वरील दोघेही गृहस्थ स्टेशन पर्यंत म्हणून माझे बरोबर आले. काय असेल तें असो, तिकिट काढतेवेळीं त्यांनीही आपलीं तिकीटें काढलीं, आणि मला निरोप देण्याऐवजी आपण ही डब्यांत येऊन बसले. वेळेवर गाडी सुटून आमची तिघांचिही शिर्डीची यात्रा सुरु झाली. मध्यंतरीं मनमाड स्टेशनवर आम्हाला उतरून डाउन मनमाड गाडी येईपर्यंत आम्हाला रहावें लागलें. आणि तितक्या अवधींत जन्मात पाहिली नाही अशा थंडीचे कडाक्याचा अनुभव मिळाला. ठराविक वेळीं गाडी आली आणि सकाळीं सहाला आम्ही कोपरगांव स्टेशनवर उतरून साडेसात सुमारास आम्ही शिर्डीगांवचे पुण्य भूमींत प्रवेश केला. पहिल्यानी रस्त्याचे बाजूनें नाशिकचे गोदेच्या पाण्याचा पाट वहात असलेला पाहून आनंद झाला.

पुढें खुद्द नगरींत आम्ही पोंहोचलों त्यावेळी तीं तिकडचीं छप्पर वगैरे नसलेलीं मातीचीं घरें पाहून कौतुक वाटलें. पण आमचें सर्व लक्ष श्री साई बाबाकडे लागलेलें होतें. इतक्यात एका घराचे मातीच्या छप्परावर एक काळाकुट्ट भव्य नग्न दिगंबर

व्यक्ती उभी असून तोंड वेडें वाकडें करून सूर्याकडें करून सूर्याकडे पहात असलेली दिसली. त्याना पाहिल्यावर हेच सांईबाबा असतील काय ? असा क्षणभर भास झाला, आणि तो प्रश्न तिकडील मंडळीकडे आम्ही केला, त्यावर त्यानी हे बाबा नसून शेगांवच्या महाराजाचे एक शिष्य आपला उद्धार करा । म्हणून बाबाचे पायांशी येऊन, मौन राहिले आहेत असें कळलें. त्यावर बाबा आतां कोठें आहेत म्हणून विचारल्यावर त्यानी 'बाबा बाहेर गेले आहेत आतां परत येतील' शिंग वाजतें तें ऐका. आणि मठांत जाऊन बसा. वरून आम्ही शिंग वाजत असलेल्या दिशेकडे पाहिलें तों लांबच्या अंतरावर एक लाल रंगाची मोठी छत्री आणि पुष्कळ लवाजमा येत असलेला दिसला. तें पाहून आम्ही मठांत जाऊन बसलों, तिकडे खालीं सभामंडप, वरती समोर सदरी सा...ी उंचवट्याची जागा, व्यास पीठ, त्यावर उजव्या बाजूचे समोरचे टोंकाला चांदीची प्र... ळ असलेलें आसन, मध्य भागीं भिंतीला लागून अहोरात्र तेवत असलेली लामण दि...ची सरमाळ, डाव्या बाजूला सदा पेटत असलेलें अग्निकुंड, धुमी, त्यांत कितीतरी म...ा चिल्मी भाजत आहे. सर माळीच्या बाजूला महंमदीय धर्मांचें अल्लाचे हातासारखे ...ह अशी ती रचना पहात आहों; इतक्यांत मघाशीं लांब दिसलेल्या त्या लवाजम्या...ीं बाबांची स्वारी मंडपांत आली. पहावें तों, काळ सांवळा, हाडापेरानी मजबूत, व... ला किंचीत वांक आलेली, अंगात तो मळकट असा अरबी तऱ्हेचा कफनी वजा पा... ळ अंगारखा, डोक्याला, एक कपाळाला वेष्टून लहान चिंधी कशीतरी गुंडाळलेली. अशा पोषाखांत, या खांद्यावरून मान उडवीत, वांकत, तोंडानें शिमग्यातील शब्दांनीं शिव्या देत स्वारी येऊन आसनावर बसली. हें पाहुन झटदिशीं आम्ही उठून भेटीसाठीं म्हणून आणलेला बदामी हलवा वगैरे घेऊन समोर जाऊन बसलों. आम्हाला पाहिल्याबरोबर " बोम्बईसे आया बैठो " असे शब्द उच्चारले. आम्ही नमस्कार करून समोर ते जिन्नस ठेविले. त्यानी आम्हाला उदी दिली ती घेऊन आम्ही तिकडुन उठून खाणावळींत गेलों. कारण त्या दिवशीं आमच्यासारखी आणखीही पुष्कळ यात्रा आली होती.

आंघोळी वगैरे उरकून आम्ही दुपारी महाआरतीच्या वेळीं तिकडे गेलों तो तिकडील तो थाट पाहून मन थक्क होऊन गेलें.— कितीही नास्तीक पाषाण असला तरी या वेळीं मन इकडे लीन झालेंच पाहिजे असे उद्गार श्री. बस्तोडकरच्या तोंडातून आपोआप बाहेर पडले. खरोखर त्या वेळचा तो देखावा आठवला म्हणजे मन कसें अगदी तल्लीन होऊन जातें. त्यावेळी दिव्याचे चकचकाटांत स्वारी चांदीच्या आसनावर अधिष्ठित झाली होती. प्रत्येकाची पूजा चालली होती, कोणी डोक्यावर गंधाक्षता घालतात, कोणी फुलें घालतात, कोणी बेल तुळशी वहातात, कोणी आरति ओंवाळतात,

कोणी हातांत तांबूल देतात, अशा तऱ्हेचा हा पूजा समारंभ एक तास चालला होता.

आर्तिचा उत्सव संपल्यावर सर्व मंडळी जेवायाला गेली. पण तिकडील वहिवाट अशी होती कीं कोणही मनुष्य कोणतीही कामना मनांत धरून दर्शनाला आला असला तर त्या कामाची मुख्य वेळा म्हणजे रोज, जी, काहीं नवीन यात्रा उपस्थित होई. ती म्हणजे नवी, जुनी सर्व मंडळीची बैठक श्री. बाबा शेजारी व्यास पिठावर भरायाची, दक्षणा अर्पण करायची, त्याना बाबांकडून उदी प्रसाद मिळायचा, आणि ज्याचें काम झालें असेल त्याला निरोप व्हायचा. त्याप्रमाणे आम्हीं तिकडे जाऊन त्यांचे शेजारींच बसलों. साईबाबाचें अनेक तऱ्हेच्या भाषानी वाणी सारखी चालू होती, हातांनीं लोकांकडून दक्षणा घेत आणि ती आगांरख्याच्या खिशांत घालीत, लोकाना प्रसाद देत, मधून कोणी काय विचारलें, तर उत्तर देत, असा तो क्रम चालू झाला. श्री. बाबा सारखे बोलत असत, आणि तिथें असलेले सर्व लोक मनांत जें कांहीं धरून बसलें असतील त्यांचीं उत्तरें त्यानी आपल्या परिक्षेबद्दल विचारलें त्याना होईल म्हणून सांगितलें.

न विचारतां मिळून सर्व मंडळीचें पूर्ण समाधान होत असे. माझ्या सोबत्यानी काय, चार आठ आणे दक्षणा पुढें केली, ती घेऊन त्याना पुरे म्हणून सांगण्यांत आलें. मी एक रुपया पुढें केला तो घेऊन खिशांत म्हणण्यापेक्षां ती त्यांची तिजोरीच होती, कारण सर्व पैसा खिशांत टाकायाचा आणि त्याचा विनियोग त्याच वेळीं ज्या कोणाला जें काही द्यावयाचें असेल, तें त्यातूनच काढून द्यावयाचे असा जमा खर्च चालत असे. रोजचा सर्व खर्च अशा रितिने भागत असे, असें सांगतात. माझा रुपया खिशांत घातला व प्रसाद दिला. आणि कोणालाही समजूं न देतां अशी काय मला हातानें खूण करून माझ्या मनांत चालू असलेल्या विचारांचें उत्तर दिलें, कीं तें पाहून मी गारच झालों. त्यावेळीं मला एक कुमारिका आपल्या पाशांत अडकावयाला पहात होती एवढें सांगितलें म्हणजे पुरे). त्या नंतर आम्ही बाबांचे फोटो विकत घेतले ते त्यांच्या हातांत देऊन परत घेतले. ( या वेळीं एक गोष्ट सांगायाची राहिली ती, ही कीं, आम्ही रिटर्न तिकीटें घेतलीं होतीं आणि त्याप्रमाणें त्यांचा निरोप न विचारतां गाडीवर जाण्यासाठीं टांगा सुद्धां ठरविला होता ! आणि आम्ही आतां नमस्कार करून जाणार अशा वेळीं एकाएकीं श्री. साईबाबानी आम्हाला " अबी बोम्बइकू नई जाना, वाड्यामें बैठोजाव " असें सांगितलें. आणि पाठाल गांवाच्या गृहस्थाला हाक मारून " ये लोगकू सावके वस्त गुऱ्हाळ मे लेके जाव आणि [illegible] कारस पिनेकु देव ."

मग काय करणार तसेच आम्ही [illegible] आलों. टांगा पैसे देऊन [illegible] केला. आणि तिकिटें पडून राहिलीं. [illegible] सोबती [illegible] गेले, मला मात्र झोंप येईना. कांहीं वेळ

तसाच पडून राहिलों. इतक्यांत मला मधून पुष्कळसा कलबला कानावर आला, वरं हें आहे तरी काय ? तिकडे काय चाललें आहे हे पहाण्यासाठीं तिकडे गेलों. पुष्कळ मंडळी जमली असून त्यांत तीन थाज्या पेठ्या तीनचार तबले वाजत असून भक्तगणांचे तीनचार मेळे बाबांची स्तुतीपर गाणी म्हणून ताल सुरावर भजन करीत आहेत, त्या सगळ्याचे एकच चालू पद म्हणजे " साईबाबारे साईनाथारे " हे सर्व पहात मी मंडपाचे बाहेर लांब उभा होतों. हे बाबांनी पाहून मला " ए छोकरा इदर आव " म्हणून हातानी जवळ बोलाविलें. मी तिकडे जाऊन नमस्कार केला आणि त्याना पहात राहिलों तों त्यांनीं " अभिवाडामे जाव आणि दुसरा पांच रुपये घेऊन ये " असें सांगितलें. माझे जवळ त्यावेळीं हीं पांचशेंची रकम होती. मी तडक येऊन पांच रुपयांची भेट नेऊन त्यांच्या हातांत दिली आणि तिकडे बसून याचें कारण मला बाबापाशीं वरील रा. नेरकरांसंबंधाने बोलायाचें अगर विनंति करायची होती. इतक्यांत बाबांनी एकदम भयंकर मुद्रा करून डोळे वटारून आणि लाल लाल करून लांब दृष्टी करून तोंडानं मोठ मोठ्यानें लींगोंच्चार करून अनेक तऱ्हेने बहुतेक युरोपियन शिवाय करून सर्व भाषांतून शिव्या देण्यास सुरवात केली. समक्ष कोणाला तरी शिव्या देतात इतका हा जमदग्निचा अवतार कां धारण केला याचा कोणालाच कांहीं उमज पडेना. सर्व मंडळी भीतिनें गार झाली.

ही आग कोणावर पाखडतात आणि कोणाच्या यच्चयावत पातकाचा झाडा घेतात कांहीं समजेना. नजर मात्र लांब फेकलेली. कोणी स्तुती करीत होते, वर्ध्याचे श्री. नाईक कीं कोण समोर बसून सांईलिला की काय ग्रंथ वाचीत होते. पण हा प्रकार पाहून सर्व जण तिथल्या तिथें तटस्थ झाली. यांच्या तोंडानें तर आतां अमुक XXX कर्म करून माझ्या जवळ करवली आलीस, मी तुला हड्डी बाहेर हांकून देईन. असा हा प्रकार सारखा दहा मिनिटें पर्यंत चालूच होता. इतक्यांत लांब झाडींतून बाबांची नजर ज्या दिशेला होती, त्या दिशेने कलाबतू वर सूर्यकीरण पडून चक्क चक्क प्रकाश दिसायाला लागला, म्हणजे कोंणी दोन बाई माणसें लांबून येताना दिसूं लागलीं. तीं जसजसी जवळ येत चाललीं, तसतसी बबाची नजर दुसऱ्या बाजूने वळवून चिलमी तोंडांत धरून ओढूं लागले. इतक्यांत एक मध्यम वयाची बाई साधारण सुंदर अशी जरचिं कांठ आणि पदर असलेले पातळ नेसलेली दासीसह आंत आली आणि लांब उभी राहून नमस्कार केला. पण बाबांनीं तिच्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. नंतर कोणीतरी भीत भीत बाबानां कुठल्याशा गांवच्या ( नगर जिल्ह्यांतील ) जहागिरदाराची विधवा आपल्या भेटीला दर्शनाला आली असल्याचें सांगितलें. त्यानंर कोळ्यांचे भाषेंत कशाला मला त्रास देतात, मी त्याची सर्व [illegible] सांगितलें नाहीं ! आतां तिला [illegible] असे शब्द निघालें.

त्या नंतर काही वेळानें संधि साधून मी हळुच रा. नेरकरासंबंधीं गोष्ट व त्यांच्या मुलां बाळांची स्थिति सांगितली. सर्व हकिगत शांतपणानें ऐकून घेऊन सदर नेरकरानां बोलावून आणून उद्यां याचे बरोबर चल अशी आज्ञा केली. वार पहिल्यानें मी, सदर नेरकरना शोधून काढून त्याजकडे मी गोष्ट केली होती, ते माझ्या ओळखीचे होते. पण इकडे ते दाढी वगैरे वाढवून कुठेंही एका बाजूला असत पण त्यानी मला दाद दिली नव्हती. त्यानंतर ठरल्याप्रमाणें रसाचा फा वगैरे होऊन आम्ही रात्रींच ते आपल्या गुप्त जागीं जाण्यापूर्वी त्यांचा कृपेचा घेतला. दुसरे दिवशीं तिकडून निघून आमच्या जागेवर आम्ही सुखरूप पोंहो तात्पर्य ध्यानिमनी नसतांना त्यानचि प्रेरणा करून मला आपल्या पायांचें दर्शन दे या जीवन कलहांत समाधानाला जागा करून ठेविली. त्या महापुरुषांचे चरण आठ काळ कंठींत रहाणें हेंच माझें कर्तव्य आहे असें मी समजून असून त्या उद्धारक चरणीं मन लीन करून सर्वेजनः सुखी नोभवन्तु अशी प्रार्थना करून रजा घेतो.

नम्र

S. M. WAGLE

Santa-Cruz Ilhas Goa.

# Shri Sai Baba of Shirdi

WAGLE, Goa, 23rd May 1939.

MAY LORD MANGESH BE PLEASED

Shambu Mangesh Wagle, of Santa Cruz, Ilhas Goa, now resi- in Thalakwadi, Belgaum, says:—

There was, in my life a time--not even of 24 hours' duration, Recollection of which fills my heart with overwhelming bliss.

It was the year 1911. I was then the Manager of the immovable erty of Madgaokars at Borivili (suburb of Bombay). Mr. vant Ramchandra alias Balabhai Madgaokar asked me one day ther good Sonkevada (a kind of yellow leafy fragrant plant) can ad in Goa. I said 'Yes, they can be had in plenty at one parti. r season only in the year. Mr. Balabhai added that Mr. Govind hunath alias Annasaheb Dabholkar 1st. class Magistrate at dra wants it as his Guru Shri Sai·Bada of Shirdi is very fond of chu--pills scented with Sonkevada and requested me to procure same. Accordingly I arranged to get within one week some good kevadas and sent them to Mr. Dabholkar. Since then Mr. Dabh- ar became acquainted with me & this acquaintence later developed o close & symphathetic friendship. I still feel grateful for his ing kindness to me. Once by chance he saw me at Borivili Station calling a merchant of his, who was of Bhansali caste, said to him When you next go to Shirdi, take this Mr. Wagle with you." I s surprised and said "Raosaheb, why do you trouble yourself th such things? I have nothing to ask of Him & therefore why ould I trouble Him for nothing?" "Alright, but still you better go ere" was the reply. I rejoined "I shall consider." Just at this time e train left. The commanding words of Mr. Dobholkar made an pression on my mind. I told all this casually to one Mr. Damodar aghunath Thakur of Borivili when I saw him. He was overjoyed hear all this and said that Mr. Dabholkar was not a man who

would say this to any man and as he has specially asked you to go to Shirdi, you should better go there. His daughter and grandchildren who were close by, at once joined Mr. Thakur and added with one voice "If you go to Shirdi you should bring back with you our Appa meaning Mr. Pandurang Sakharam Narekar of Bassein who was the son--in--law of Mr. Thakur & who was staying in Shirdi for the last two years leaving his home & childrn." I was wavering about going to Shirdi but this incident settled me. The same year in the month of December I got leave & came to Bombay on my way home, & stayed with my friend Mr. (now Dr.) Bastodker. I told Mr. Bastodkar and another friend Mr. Padurang Anant Kekare then studying for the B. A. Examination my determination to go to Shirdi. They did not say anything to me then, but when they came to see me off that night on the Boribunder Station, I was surprised to see them coming with me to Shirdi. During the night we had to get down at Manmad. It was very cold then. After waiting for some time, we had to catch another down Manmad train. At 6 A. M. we alighted at Kopergaon and reached the holy land of Shirdi at 7-30 A. M. On our way we were pleased to see the Holy Godavari flowing along the road and at Shirdi the tileless mud-houses was a curious sight for us. We saw on the earthen ceiling of a house a black tall stark-naked figure standing and staring at the sun. We asked some people whether this man was Sai Baba. They said No, he being a disciple of Shegao Maharaj, coming here & staying at Sai Baba's feet and ptactising the vow of silence for redemption. On being asked where is Sai Baba, they said that He is gone out & would be just returning Just hear the horn blowing, go & sit in the Math. Looking at the direction of the blowing horn, we saw a big red umbrella and a procession. We then went and sat in the Math (Dwarkamaye.) There was the Audience-hall below, Platform above, Vyaspeetha, to the right of it in front a silver-decorated Asan, in the centre, day and night burning row of lamps, to the left everburning Dhuni. Immediately Baba came along with the procession. He was rather black hale, strong of bone & limb, little bent at the waist, wearing a long flowing Arabi fashion robe (Kafni) and tying a piece of cloth round the

forehead. Arrayed thus and swinging his neck from one shoulder to another `and at times bending it and speaking & abusing in coarse language Baba came & took his seat. Then everybody began worshipping him. Some were puttig red rice, colored with kumkum, ( गन्धाक्षता ) some flowers and some bel-leaves on his head, some were wavering lights, while some were offering tambul. Such Pooja-ceremony was going on for an hour or so. We went up to Him with Badami-halva brought as a present. Seeing us Baba said " Come from Bomay, alright sit down. " We bowed and placed the present in front of Him, receiving the udi. We departed and came to a hotel. There were many pilgrims like us that day. Finishing the bath & e.t.c. we again went there at the time of the Maha-arti. We then saw the whole scene and were amazed. My friend Mr. Bastodkar at once remarked " However hard an Atheist may be, he would be melted here. " After the Arti was finished, some of the old & new comers were sitting with Baba offering their dakshina, and taking his permission & udi at the time of departure. We were among them. Sai Baba was talking in various dialects incessantly and thus directly or indirectly satisfying the inward questions & difficulties that were troubling the devotees. My friends asked about their examinations and Baba answered that they would get through successfully. They gave 4 & 8 annas as dakshina. Baba took it and said that it was enough. I gave one rupee, which He put in His pocket-treasury out of which Baba spent according to needs. He gave me prasad and made such gestures with his hand, which were unintelligible to others but which I could easily follow. The gestures were a direct reply to what was troubling my mind as some girl was trying her best to catch me in her net. This dazed me completely. We had bought some photos of Baba, which we placed in his hands & got them back from him. We wanted to return immediately on account of our return-ticket, but Baba said " Don't go to Bombay now, go & sit in the wada & calling a man named Patil said " Take these men in the evening to the joggery-works and give them sugarcane juice to drink " So we sent the tonga and stayed in the wada. My friends took their noon-naps. I was awake & was merely lying

down and resting. Hearing a great noise I went to the Math, three pianos and four tablas were working and many persons assembled; they were singing Baba's praise. I was standing outside and hearing. Suddenly Baba called me and said " Go to the wada & bring Rs. 5. as dakshina." So I went to the wada & returned with a five rupees note which I gave to Baba and sat near him. Immediately Baba assumed a terrible attitude reddened and stretched his eyes and staring at a long distance, began to abuse in all dialects except English. Why Baba suddenly got wild like Jamdagni, nobody could say. Some were praising Baba, some Naik of Wardha & others were reading Sai-leela. All became silent like statues and began to look at Baba, but His look was fixed at a long distance and he was saying something like this " You did such & such, so many sins and why do you come here now, I shall drive you out. "This was going on for about 10 minutes. Then from the direction where Baba was looking, some glistening things began to appear. In other words some 4 or 5 persons dressed gaudily were seen coming. As they came very close Baba turned away his look to other side and bagan to smoke his chilim. Then a fair, middle aged lady dressed in a beautiful Jari-sari came in with her maids and standing aside made a bow. Baba did not care to look at her at all. Somebody said that the lady was the widow of a rich Jahagirdar in the Nagar district & had come for Baba's darshan. Baba said in fisherman's dialect " Why do they trouble me now, did I not say all about this before, ask her to sit. " Then seeking an opportunity, I spoke about Mr. Narekar, and told Him the condition of his wife and children. Baba heard me calmly and sent for Mr. Narekar and ordered him to go with me. Before this I found him out & spoke to him about his return. He had grown a beard and was passing away his time in some lonely retreat there. He did not listen to me but he dare not disobey Baba. So he had to return with us. As arranged we had the rasaparty and before Baba went to his sleeping abode ( the chavadi ) we took his permission to depart and starting next day we returned home safely.

To conclude: we did not know and think of Baba; but he out of his infinite kindness inspired us and gave a darshan of his holy Feet and thus gave us a haven of happiness and contentment in this struggling existence. I think that my duty is to pass away my time ever remembering his holy Feet. So placing my mind at his holy Feet I conclude with the prayer

" HAPPINESS AND PEACE BE TO ALL"

Note. This and many other statements ( vide Mr. K. L. Soman's dated 2nd & 3rd February 1939, Belgaum, which I sent you a few months' ago ) state that Baba used to get at times wild and excited like Jamdagni and nobody knew why he assumed such terrific appearance. The above statement of Mr. Wagle gives the clue. Baba got wild & enraged at the bad deeds or sins of the devotees as they came near him. In fact he read all the past and present sins lurking in the innermost recesses of his devotees and by his rage & fury drove away the sins and thus purified the devotees. So Baba's outward anger or rage was inwardly clothed with infinite mercy.

PEACE BE TO ALL

N. V. Gunaji.

## SHRI SAI BABA OF SHIRDI.

### A DEVOTEE OF BELGAUM. 23rd March 1939.

A devotee of Belgaum, who is uuwilling to disclose his name and identity, says :

In 1930 I heard about Sai Baba from Mr. K. G. Ajrekar and then I wished that I had seen him ( Sai Baba ) long before as I was studying about 1914 in Poona, which was so near to Shirdi. I wished to read the magazine Sai-lila. A shopkeeper at Poona gave me all Nos. of the magazine for perusal. Then I wanted to see Sai Baba in his real spirit. I wanted to go to Shirdi to see him there if possible, but I could not go there. So I left the

matter entirely to his will. In my wanderings & professional business about 1936-37 I came accross a Man, who as he appears, would not have been a devotee or disciple of Sai Baba or anyone else. From the very first sight, we were both attracted to each other. The first handshake with him, who is the real disciple of Sai Baba, gave me such a thrill, which I shall never forget. Then I had a professional talk in the presence of other people for about 15 minutes only and we had a general talk on spirituality. I was surprised to hear such a talk from such a man. Then I saw him in the evening again. We had a casual talk about Sai Baba. Then I informed him my interest in him. After two days we met again and during our meetings I was fully satisfied that Sai Baba was, from his illuminating remarks present there during our meetings. So I was fully satisfied that Sai Baba was living in spirit with us and I dropped the idea of going to Shirdi, leaving the matter entirely to his sweet will.

PEACE BE TO ALL

## SHRI SAI BABA OF SHIRDI

N. V. GUNAJI, BELGAUM. 3rd. March 1939.

Nagesh Vasudev Gunaji, B. A. LL. B. Pleader and ex: Chief Officer, Belgaum Municipality, residing in Thalak wadi, Belgaum, says :-

Many years ago I had heard from some of my friends about Shri Sai Baba and his miracles but unfortunately for me he did not draw me to him while he was living. Some 4 or 5 years ago I saw with my friend, the late Mr. K. G. Ajrekar, pleader, the book "Sai Satcharitra (Marathi verse) by Mr. A. Dabholker alias

Hemadpant and some No. of Sai-lila (Marathi monthly). When I went through these carefully I felt a very great love & devotion for Sai Baba and he then captured me. Three years ago I had been to Bombay for some private work and had a mind to go to the holy place Shirdi on my way home, but finding that I had no sufficient money with me to do that pilgrimage, I changed my mind. With what little money I had, I purchased (1) Sai's satcharitra by Mr. Hemadpant (2) Shri Sai Baba of Shirdi-A glimpse of Indian spirituality by R. B. M. W. Pradhan (3) Two Marathi pamphlets named Sainath Sagunopasana & Sailila Kirtanakhyan Anka and (4) Pictures of Sai Baba and thus brought " The Real Sai Baba " home with me. Since then we (my wife and myself) have been regularly reading Sai Baba's life and Lila specially on Thursdays and we find that Sai Baba is always with us whenever we implore his help. I give some instances below.

About two years ago I had, one night terrible shooting pain in my stomach. The pain was so severe that I thought I was passing away and I thought that I should wake up my wife & others and appraise them of the impending danger; but my inner voice said " why not try Sai Baba ? " So instead of waking up my people & frightening them I remembered Sai Baba and surrendered myself to him and lo! The pain immediately vanished and I had a good sleep. There was no trace of pain next morning or ever afterwards.

My wife is more devoted to him and whenever there is any difficulty, calamity or illness in the family, she appeals to Sai Baba makes a vow & offers sweatmeats & and strange to say that Sai

Baba often does not fail to respond. Last January when I was in Tiruvannomalai for Ramanjayanti and then in Madras to see Mr. B. V. Narsimhaswami, an incident occurred here worth-mentioning. The daughter of a friend of mine at Bombay had been here to see my daughter and and they had both gone to the cinema, where they were observed by one Military officer. After my friend's daughter left for Bombay, that Officer stealthily followed my daughter every day for some time. As I was not at home my wife was at a loss to know what to do, but as usual she appealed to Sai Baba, and it so happened that on one Saturday of that week when my wife had gone to Shahapur for some work, that officer was found out near about my house and caught by my son and his friends who wanted to hand him over to his superior officer. The man surrendered, confessed his guilt and apologized and the trouble was over.

To close with a fresh instance. Early this month I somewhere mislaid currency notes worth about Rs. 75 and could not trace them. I got very nervous and and thought that they were taken out or stolen by somebody. I was in a fix and did not know what to do. My wife who was also searching the notes with me immediately offered sweatmeats to Sai Baba on the coming Thursday Reading & Arti and lo. within half an hour the missing notes were found & we were relieved.

These instances show that the Spirit of Sai Baba is ever living and whenever he is invoked with proper surrender and devotion, he is ever ready to help and does help in his infinite love and mercy.

PEACE BE TO ALL.

# अनुभव

( मागील अंकावरून समाप्त )

मी श्री. सा. बा. च्या दर्शनास गेलों असतां कित्येकदां तेथें भाटे, पारशी वगैरे लोकांच्या सुस्वरूप बायका व मुलीही दर्शनास येत असत त्या कांहीं वेळ श्री. सा. बा. च्या जवळपास बसत असत. अशा वेळीं कांहीं पुरुष मंडळी तेथें असत. यांत नेहमी तेथें असणोर लोक व बाहेरून येणारे लोक असे दोन्ही प्रकारचे लोक असत. अशा वेळीं या लोकांची दृष्टी साहजीकपणेंच तेथें जमणाऱ्या सुस्वरूप स्त्रियांच्याकडे वेधली जाई आणि एकंदरीत मनुष्य स्वभावाकडे पाहिलें तर असें होणें अत्यंत स्वाभाविक असेंच होतें. पण बाहेरून येणाऱ्या लोकांच्या वृत्तींत श्रद्धा, भक्ति, व भाव हे वसत असल्यामुळें त्यांच्या चेहऱ्यावर विशेष चलबिचल झाल्याचें दिसून न येतां त्यांचे सात्विक भाव प्रगट होऊन ते गंभीर वृत्तीचे असल्याचें दिसत असे. पण ते नेहमी असणाऱ्या लोकांच्या मनोवृत्तींत मात्र चांचल्य प्रगट होत असल्याचें स्पष्ट दिसत असे. श्री. सा. बा. च्या वृत्तींत केव्हांही कोणच्याच प्रकारचा फरक पडत नसे. ते अत्यंत गंभीर, शांत व समचित्त असल्याचें स्पष्ट दिसत असे. तेथें येणाऱ्या या सुस्वरूप स्त्रियांच्या मुद्रेतहि यत्किंचितही चांचल्य दृष्टीस न पडतां उलट त्यांची निष्पाप व निर्मळ वृत्ति ही दृग्गोचर होऊन त्यांच्या ठिकाणीं सात्विक भावांचें स्पष्ट प्रदर्शन होत असे. असा देखावा पाहिला म्हणजे माझ्या सारख्या बाहेरून येणाऱ्या मनुष्यामध्यें मनांत सकृद्दर्शनीं जरी कांहीं पापी भावना व किल्मिष उत्पन्न झालें असलें, तरी त्यांच्या या सात्विक मुद्रेनें ते जागच्या जागीं विरून जाऊन तेथें सात्विक वृत्तीचा आपोआप उदय होत असे. मला वाटतें, साधूंचे दर्शनानें दुसरी कांहीं प्राप्ती नसली तरी मनुष्यांच्या भावनाशुद्धीचें काम त्याला नकळतच होत असतें, हा कांहीं सामान्य लाभ नव्हे. साधूसंतांच्या चरित्रांच्या वाचनानें जें भावना-शुद्धीचें कार्य होतें तेंच कार्य त्यांच्या सान्निध्यांत त्यांच्या प्रत्यक्ष दर्शन लाभानें अधिक होत असतें. श्री. सा. म. हे केव्हांही वेदान्त सांगत नसत. अथवा भक्ति मार्गाचाही उपदेश त्यांच्या प्रत्यक्ष वर्तनानेंच उदाहरणानेंच शिकविला जात असे. असें म्हणण्यांत कांहीं अतिशयोक्ति होईल असें मला वाटत नाहीं.

श्री. सा. म. केव्हां केव्हां एकाद्या मनुष्यास तो दर्शनास गेला असला तर त्यास गुरुचरित्र वगैरे सारखे प्रासादिक ग्रंथ वाचून त्याचा सप्ताह करण्यास सांगत. श्रीयुत

ओक नांवाच्या एका तरुणास त्यांनी गोव्यांत बसून ( तो उतरला होता त्या घरच्या ) गुरुचरित्राचा सप्ताह करण्यास सांगितले होतें.

मशीदीमध्यें असतां श्रीस महाराजांचे तीर्थ व प्रसाद वांटीत असत व तें सर्व लोक मोठ्या भक्तीने ग्रहण करीत असत. पण हें तीर्थ महाराजानी प्यालेल्या भांड्यांतीलच असे. तें घेण्यास कित्येकांची मनें जरी प्रथम साशंक होत तरी भावभक्तीनें म्हणा अथवा लोकविरुद्ध दिसूं नये म्हणून म्हणा सर्वजण घेत असत. मशीदिमध्यें महारोग्यासारखे रोग्यांस येण्यास जरी मज्जाव नव्हता तरी मशिदींतील महाराजांच्या व्यवस्थापकांनी ते तेथें न यावेत अशी व्यवस्था ठेविली होती व महाराज सकाळी लेंडीस जातेवेळीं रस्त्या-वर दुतर्फा हे महारोगी उभे राहून महाराजाच्या दर्शनाची वाट पहात असत. व यावेळीं महाराजांच्या पायांवर मस्तक ठेवून ते महाराजांचे दर्शनहि घेत. या त्यांच्या स्पर्शामुळें महाराजांच्या मुद्रेवर यत्किंचितही फरक पडत नसे. उलट ते त्यांचेकडे दयार्द्र दृष्टीनें पाहत असल्याचें दिसून येई. माझ्यासारख्या मनुष्यास हा सर्व प्रकार जरी अत्यंत ( जुगुप्साजनक ) ओंगळ व स्पर्शजन्यरोगोद्भवक वाटे तरी महाराजांची ही वृत्ति पाहून त्यांचे-विषयी माझा आदर अधिकच दुणावत असे—व सत्पुरुषांच्या वृत्तीत दैवीगुणांचा कसा उत्कर्ष झालेला असतो याचाहि पडताळा तेथें पहावयास मिळून एक प्रकारचे शिक्षण मिळत असे. महाराज मशिदीत असतां त्यांच्याकडे लहान अर्भकें येत. व तीं शेंबडी-लेंबडीच असत. तरीही महाराज त्यांस उचलून घेऊन आपल्या कोपिनीनें अंगावरील वस्त्राने हांसत हांसत त्यांचे नाकतोंडे पुसून स्वच्छ करीत. आणि नंतर त्यांचे हातांवर खडीसाखर अथवा दुसरा खाण्याचा पदार्थ देत. यावरूनही त्यांच्या समत्त्व ममत्वबुद्धीचे साहजिकपणेंच प्रदर्शन होत असे. व हेंच भाविक भक्तास एक प्रकारें शिक्षण-प्रद होत असे.

श्री. सा. बाबांची वृत्ति नेहमी शांत, आनंदी व सम अशी असे. परंतु आठव-ड्यांतून एखादे दिवशीं त्यांच्या मनोवृत्तींत भयंकर खळबळ झाल्याचें दिसून येई; व त्यांनीं रुद्रावतार धारण केला आहे काय असा भास होई. एके दिवशीं रात्रीं, मी इतर मंडळीं-बरोबर राधाकृष्णामाईच्या घरी जाऊन तेथून आरती झाल्यावर परत येत असतां, रस्त्यांत महाराजांची वृत्ति एकदम बेफाम झाल्याचें दिसून आलें. त्यांचें डोळे लाल झाले होते. ते अगदी ताठ उभे राहिले होते आणि हातांतील सोटा दोन्ही बाजूनी फिर-वीत होते. यामुळें बरोबर लोकांत भीती उत्पन्न होऊन पळापळ सुरु झाली. हा प्रसंग मी पहिल्यानेंच पाहिला. पण महाराजांची वृत्ति इतकी उसळण्याचें कारण काय याबद्दल माझा काहींच तर्क चालेना. यासंबंधीं मी पुष्कळांकडे शोध केला. पण त्यांचेकडून मला

समाधानकारक असे उत्तर कांहीं मिळालें नाहीं अशा प्रकारची पैशाची वृत्ति ही श्री—अक्कलकोटकर महाराजांचे ठिकाणी पुष्कळदां दिसून येत असल्याचें मी कर्णोपकर्णी ऐकले होतें. यानंतर कोणी मला असेहि सांगितलें कीं, आरतीनंतर महाराजांच्या अंगांत श्री अक्कलकोट महाराजांचा संचार झाल्यामुळें असा प्रकार घडून येतो व त्याला प्रत्यक्ष न दिसणारी अशी कांही कारणेंहि—पापादिक घडून येत असावीत. पण हें ऐकून माझें विशेषसें समाधान मात्र झालें नाहीं—स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीहि सदोदित सात्विक वृत्ति दिसून येत असता तेथे एकाएकी तामस वृत्तीचा असा क्षोभजनक उदय कां व्हावा हें एक गूढच आहे. याचा शास्त्रज्ञांनीं विचार करावा. महाराजांच्या ठिकाणीं असणारा मनकवेडपणा, भूत भविष्यकाळाचें ज्ञान व अशाच चमत्कारपूर्ण इतर गोष्टी या केवळ योग सिद्ध पुरुषासच प्राप्त होत असतात. पांतजळ योग दर्शनामध्यें अशा अनेक गोष्टींचा उल्लेख आहे. त्यावरून श्री. सा. बा. हे एक मोठे योगी सत्पुरुष असले पाहिजेत असा माझा ठाम समज झाला; त्यांच्याकडे भाविक भक्त प्रत्यक्ष देवाच्या दृष्टीनें पहातात हेंहि योग्यच आहे. कारण योगसिद्धीनें जे देवस्वरूपीं मिळाले, ते देवच नव्हे तर काय ? अशा सत्पुरुषांकडे कोणी भोळ्या भावानें जावो अथवा चिकित्सक दृष्टीनें जावो, त्यांच्या सात्विक वृत्तीच्या प्रभावामुळें या दोघांच्याहि वृत्ती सात्विक बनणे स्वाभाविक आहे.

---

## भाषांतर

(Continued from last issue)

When I was at Shirdi, some beautiful ladies of the bhatia, parsi & other communities used to come at times with their daughters for getting a darshan of Sai Baba & sit with him for some time. At this time some male persons used to be present. They consisted of (1) those who frequented there of them & (2) outsiders. Looking to the human nature it is but natural that the eyes of these people were often directed towards the beautiful ladies; but there was this difference. The outsiders who were filled with faith, devotion & adoration had their features calm and unmoved and looked more satwic; while those

who were always there betrayed restlessness in their countenance. There was absolutely no change of any sort & at any time in Sai Baba's countenance. He was always calm, solemn and balanced. There was also no change in the features of the beautiful ladies themselves who come for darshan. They always looked simple, innocent and sattwic ( devout ). The effect of such sight was wonderful. If any outsider like myself entertained at first any wrong and sinful motives they were immediately absorbed by the predominantly sattwic character of the ladies and in their place pure sattwic thoughts arose. To me it seems that if there be no other gain from a Saint's darshan, the purification of thoughts ( mind ) is being unconciously effected. And this is no small or ordinary gain. The purification of the mind that is effected by reading the lives of the saints is more readily & promptly achieved by a darshan or practical contact of a saint. Sai Baba never preached Vedanta or Bhakti-marga, but the lesson of Vedanta ( knowledge ) and Bhaktimarga ( Devotion ) was practically instilled into the minds of the people by his demeanor & behaviour precept and example.

Sai Baba at times used to ask certain persons to read daily inspired works like Gurucharitra and Bhagwat &c. and also do the saptah. I remember that one Mr. Oak was asked to finish the saptah of Gurucharitra in a cowshed of the house where he was staying.

In the Masjid, Tirth and prasad were freelly distributed and all the people received the same with devotion. The tirth consisted of the remnant of Sai Baba's cup.

Though some felt a little doubt to drink the remnant, Tirth all people took it partly with feelings of devotion and partly because they should not look uncommon & extraordinary if they refused to take it. Though lepers were not prohibited from entering the Masjid the managers there took precautions so that no such persons should come in. The lepers on the other hand used to stand in two rows on the road for getting Sai Baba's darshan when he daily went to the Landi. When he came, they used to prostrate & place their heads on Sai Bad's feet and take darshan. This made not the least change in Sai Baba's features. On the contrary he looked piteously towards them to one like myself this affair looked reprehensible dirty & contageous; still when Saibaba's eqipoised and balanced state was observed, my reverence for him increased by leaps and bounos. the sight of the predominance of divine qualities in a sage like this was a very good lesson for me.

When Sai Baba was in the Masjid children used to come there. They were often dirty; still he used to pick them up and smilingly clean their noses & faces with a cloth on his body and give them sugar-candy or sweatmeats. This gave a demonstration of his all-inclusive love and was a perfect lesson to devout disciples.

Sai Baba was always calm, joyous and balanced; but once in a week he used to get wild and seemed as if assumed Rudrs Avatar ( Terrible ). One night I had been to one Eadhamai's residence and after Arti I was returning home. On the way I found that Sai Baba become uncontrollable. His eyes were red and standing erect, he

was waving the cudgel in his hand on both sides. The people were frightened and began to run away, I saw the incident for the first ttme. I could not guess why Sai Baba should lose his control of mind like this. I enquird of many about this but received no satisfactory answer. I heard that this sort of violent temper was often seen in Akkalkotkar Maharaj. I remember some one telling me that after Arti Akkalkotkar Maharaj obsesses ( takes possession of ) Sai Baba's body and that there may be some invisible causes such as sins etc. This explanation also did not satisfy me. It is a problem that when there is a predominance of sattwic qualities in a sage, why such a display of Tamasi dassion should take place ? The adopts should solve this.

The qualities which Sai Baba possessed vis. the dividing of minds, the knowledge of the past and the future and other miracles, etc. are easily obtained by Saddhus i. e. perfect souls. Patanjali's Yoga makes mension of such things. From all this I conclude that Sai Baba was a great sage and Yogi and that it is but proper that pious devotees should look upon him as God; for, those who by their Yoga-acomplishment attained perfection or god-hood are none else but God. If people approach such sages some with devotion and others with a critical mood, they are all changed on account of the holi contact into pure and sattwic beings.

PEACE BE TO ALL.

# अनुभव

(1) I did not see Sai Baba. Being posted at Manmad Railway mail Sorting Office, I came in contact with many of the old veteren Sai Bhaktas–Dikshit, Dabholkar, Purndare, Dasganu Maharaj and others for whom I used to arrange for their needs during their halt at the Manmad Ry. Station at an odd hour at night before proceeding by the train for Kopergoan. It is through this association that Bhakti for Baba grew into me, though I neither visited Shirdi or had seen Baba myself.

It so happened that more than thrice my chance of promotion of which I was to know for certain was lost all of a sudden, the vacancy in which I was to get it not having arisen for some reason or the other at the last moment. Having heard of Baba's powers through the host of his Bhaktas proceeding to and from Shirdi and for whom I used to arrange for the needs at the Manmad Station, I was tempted to enquire about the reason for the good turns of fortune, thus being denied to me all of a sudden and the way to avert it. It was Mr.Dikshit to whom I spoke about the matter and he gave a Baba's photo and said He will give you all that you want. I started worshipping the photo and got a dream that I should prepare three vankis ( a sort of hand worn ornament ) for worship. Myself nor the Sai Bhaktas could fathom the meaning and object as the articles required were three, and not two or four as ordinarily would have been the case. Dikshit however offered an explanation while passing through Manmad for Shirdi that as Baba was God Datta three articles are needed instead of two. Days passed however and another chance of promotion was repeated and lost as usual. Then on an Ekadashi day a strong feeling grew over me that I should not eat anything that day unless I got the articles made and worshipped. I did so and the wonder was without any expectancy I received the promotion order without being transferred from my Station within a week.

( 2 ) My wife was confined to bed due to post parturition troubles and I was anxious on her account. During this trouble I had a dream that I in company of a Mahomedan friend named Shaik Kabula had gone to a creek side for a walk and we both desired to cross it though it was full tide and the creek was overflowing. We engaged a tony and the tony-man was also a Mahomedan. When the tony started with three of us in it after a short interval I found myself alone in it and the two others having disappeared. I grew anxious and started enquiring of the fishermen in the creek as to the whereabouts of my tony-man and although they said pointing out in the creek that he was there, but I could not see him nor my friend. My anxiety grew more and more but ultimately I found that I was on the other side of the creek at a long distance from the proper place.

After some days passed my wife recovered from her troubles imme- diately after this dream.

R. V. GHAISAS

*Editor*

---

श्री सन्त भाऊ महाराज यांचा फोटो शके १८६० च्या पहिल्या ( १-२-३ च्या ) अंकांत छापला आहे. पण तो आमच्या मतें चांगला छापला गेलेला नाहीं, सबब या अंकासोबत त्यांचाच फोटो पुन्हां जोडला आहे.

रा. वा. घैसास.

संपादक

---

## ऑगस्ट १९३८ मध्यें खालील गृहस्थांनीं शिर्डीला भेट दिली.

श्री. तुकाराम शंकर उंडे
,, अंबादास तुकाराम गोरे
,, रघुनाथ सखाराम मांडे
,, काशीबाई गुजराथी
श्री. धुंडिराज पंढरीनाथ येवलेकर
,, बाळाजी गोविंद रासने
,, हस्ते कृष्णांत सा. रासने
,, वि. अ. वैद्य

## माहे आगष्ट १९३८ चे शिर्डीवृत्त

श्रीसंत भाऊ महाराज यांचे समाधीपाशी ता. १०-८-३८ पासून लोकांचे नवसाचे नारळ व नैवेद्य श्री समर्थ साईबाबांचे कृपेनें बरेच येऊ लागले आहेत.

२ श्रीचे द्वारकामाइचे सभा मंडपाचे काम श्री. सगुणराव यांचे तर्फे श्रीयुत माधवराव सहस्त्रबुद्धे, शिर्डी, यानी उत्तम केले. लोखंडास रंग देणेचे काम चालू आहे. हे काम श्रीसमर्थ साईबाबांचे प्रेरणेनें श्रीचे एका भक्ताकडून श्रीनचि करवून घेतले.

३ या महिन्यात एकंदर ६ सहा किर्तनें झाली. त्याचा तपशील येणें प्रमाणें:—

श्रावण शु० ११ स व श्रावण व० ११ स व गोकुळ आष्टमीस व गोकुळ आष्टमीचा काला कीर्तन, श्री.देवी अहिल्याबाई होळकर यांचे पुण्यतिथी निमित्त, अशी ५ पांच कीर्तनें संस्थान गवईबुवानी केली. व एक कीर्तन श्रीगणपती उत्सवानिमित्त बाहेरगावचे कीर्तकार श्री. ह. भ. प. विश्वनाथ त्रिंबक आळेकर, पुणें, यानी ता. २६-८-३८ रोजी रात्री केलें.

४ ता. २८-८-३८ गणेश चतुर्थीनिमित्त रात्रीं संस्थानगवई श्री. शंकरराव पवार श्री. नानासाहेब रासने, पुणें, व श्री. तुळशीराम गुरव, बऱ्हाणपुरकर, यानी श्रीपुढें गायनाची हजेरी दिली.

५ श्रीमंत नानासाहेब खारकर, ऑ. चिटणीस श्री. सा. सं. शिर्डी मु. ठाणें यानीं श्रीस श्रावणमासानिमित्त दर सोमवार व दर शनिवार श्रीस अभिषेक केले.

६ श्रीमंत नानासाहेब खारकर यांचे पत्रावरून श्रीस अभिषेक श्री. मनोहर खारकर, कराची, यांचे नांवें करणेत आला. ता. ११-८-३८.

७ श्रीमंत रामभाऊ सामंत यांचे पत्रावरून श्रीस अभिषेक श्री. मोरेश्वर हरिश्चंद्र चुरी, बोर्डी, यांचे एक व दुसरा डॉ. छोटालाल भुलाभाई भट यांचें नांवें एक अभिषेक व ब्राम्हणास शिधा दिला.

८ श्रीच्या गाईची मिरवणूक ता. २५-८-३८ रोजी पोळ्या निमित्त वाजंत्री, चोपदार, श्रीमंत नानासाहेब रासनें, श्री. बाजीराव पाटील, श्री. सगुणराव, श्री. विठ्ठलराव वगैरे सर्व मंडळींनी मोठ्या थाटांत मिरवणूक काढली.

शिर्डीची हवा पाणी उत्तम.

आपला

बाळाजी काशिराम शिंपी, चोपदार

---

## सप्टेंबर १९३८ मध्यें खालील गृहस्थांनीं शिर्डीला भेट दिली.

श्री. माधव कान्होजी फसलें
,, पाडुरंग कृष्णराव साऊर समागमे किसन-प्रभाकर दोन मुलें.
,, विश्वनाथ गणेश देशपांडे
,, शिवानंद स्वामीं
,, सरोत्तम भाऊ हलवाई
,, दत्तात्रय लक्ष्मण मनोलकर
,, गजानन रामचंद्र खर्स्ते
,, काशिनाथ बाळकृष्ण देशपांडे
,, रघुनाथ विश्वनाथ नूलकर
,, राजाराम गोपाळराव कुळकर्णी
,, काकडे मामलेदार साहेब
,, महाजन साहेब, जी. आय. पी. रेलवे सुपरन्टेंट साहेब.

श्री. देशपांडे, रेल्वेकडील कारकून.
,, देशपांडे, रेल्वेकडील कारकून.
,, काकडे मामलेदार यांचे पुत्र.
,, बाबूराव काकासाहेब दीक्षीत समागमें कुटुंब सौभाग्यवती व मुलगा
,, ठेकळ साहेब, सुपरवायझर.
,, गोविंद आबाजी पाटील
,, गोपाळ बळवंत पुरंदरें
,, कृष्णाजी त्रिंबक ओढेकर
,, लक्ष्मण शंकर कुलकर्णी
,, सिताराम रंगनाथ नांदे
,, गोपाळ केशव पदे
,, म्हाळसाकांत आबाजी चौधरी
,, एस. आर. सुभाका

# माहे सप्टेंबर १९३८ चे शिर्डीवृत्त

श्रीमंत-युवराज साहेब- मु० मिरज यांचें प्रकृतीस आराम होण्याकरितां श्रीस ६ सहादिवस अभिषेक केलें; हस्तें माधवराव सहस्त्रबुद्धे-मु० शिर्डी—ता.३-९-३८

२.रा. रंगनाथ-बंधु—विश्वनाथ बाळाजी गुरव यानी श्रींचें मंदिरात श्रीसत्यनाराण केला. कारण विश्वनाथ यांस शाळा मास्तराची नोकरीची जागा मिळाली. तारीख ४-९-३८

३ संस्थानगवई—श्रीयुत ह. भ. प. विठ्ठलराव गवई-यांनीं भाद्रपद शु. ११ शके १८६० एकादशीनिमित्त कीर्तन केलें. तारीख ५-९-३८ श्रीवामनजयंती निमित्त कीर्तन केलें. तारीख ६-९-३८ तसेंच हरी दिनीनिमित्त कीर्तन केलें. भाद्रपद व० ११ १८६० तारीख २१-९-३८

४ श्रीयुत दत्तात्रय दामोदर रासनें, पुणेकर, यांचा मुकाम आंता पावेतो आहें. श्रींचें कामें केली त्याचा तपशील, स्वताःचे खर्चानें श्रींचे द्वारकामांईस आजूबाजूच्या भीतींस सफेती लावून घेतली; श्रींचें रथास ऑईल पेंट रंग दिला; श्रींचें श्रीद्वारकामांईतील सिव्हांसनास रंग ऑईल पेन्ट दिला; श्रींचीं चांदीचें आत्तरदान्या नग २ व गुलाब दान्या नग २ व नक्षीचें तबक नग १ असयास रीपेर करून पॉलीस करून दिल्या असें. शिवाय श्रींचें श्री. द्वारकामाईतील संभामंडपाचे नविन पत्रें घालण्याचें देखरेख करीत होतें व दुसरें श्री. सगुणराव नाईक मु० शिर्डीकर व श्री दत्तात्रय रासनें हें देखरेख पहात होतें. व शिवाय जी कामें किरकोळ लिहीण्याचें रिपेरेचिं ताकीदीचें वगैरे कामें पाह्यात होतें.

५ श्रीयुत-रघुविर भास्कर पुरंदरें, मु० वांद्रा यानीं श्रींचें करितां मोराचे पील्ले नग ३ आणिली; पैकीं दुसरें दिवशीं एक पिल्लू मयत झालें. श्रींचें लेंडी बागेंत लावण्या. करितां बदामाच्या बीया, काजूबीया, रानकेळीचें रोपें, शिवाय फुलझाडें अशीं आणून दिलीं होती ती बागेंत लाविली असें.

६ श्रीसंत भाऊ महाराजांचें मंडपाचे काम व श्रींचें गाईच्या टपरीचें काम श्री. सगूणराव नाईक मु० शिर्डीकर यांनी स्वतःचें खर्चानें करून घेतलें असें. त्याला खर्च रुपयें ६० झाला असें.

७ श्रीयुत दत्तात्रय दामोदर रासनें यांनी श्रींचें द्वारकामाईचें धुणीचें धुर जाण्याक-रीतां धुराडें टपरी स्वत: खर्चानें बांधलें असे. व दरमहीना एक अभिषेक बरेच दिवसापासून सुरूं आहे.

८ एका भक्ताकडून–मु० आस्तगांव यानीं श्रीस पिवळें सुती कापड वार १ चा तुकडा आर्पण केला असें. तारीख ११-९-३८

९ श्रीयुत–आवबळराव साहेब, ओरसीयार, मु० शिर्डी–यांनीं तारीख २४-९-३८ पासून नवरात्र प्रित्यर्थ श्रीस अभिशेक, श्रीची पुण्यतीथी होईपर्यंत करणार आहेत व त्या प्रमाणें अभिशेक सुरू आहे हस्तें विठ्ठलराव गवई.

१० श्रीयुत देव मामलेदार साहेब मु० ठाणा हे शिर्डीस मंडळीसह आलें. तारीख २७-९-३८

११ श्री. शिर्डीची हवा पाणी उत्तम आहे. पाऊस फार आहे.

## ऑक्टोबर १९३८ मध्यें खालील गृहस्थांनीं शिर्डीला भेट दिली.

श्री. नानासाहेब खारकर
,, धा. वि. देव
,, र. भा. पुरंदरे
,, रामभाऊ सामंत
,, अप्पासाहेब गाडगीळ
,, स्त्री वाहिनी साहेब
कु. इंदुबाळ गाडगीळ
श्री. ताराबाई बोरकर
,, गणेश पांडुरंग कारखानीस
सौ. मनोरमाबाई कारखानीस
श्री. गोपाळ भास्कर दातार, वकील
,, शांताराम शंकर कर्णिक
,, बाबुराव बा. देव, वकील
सौ. उमाबाई देव
डॉ. केदारीनाथ वासुदेव सावे
श्री. नानासाहेब अवस्थी
,, गोवर्धनदास डहाणूकर

श्री. त्रिकमदास पुरुषोत्तम
,, गोविंद विनायक वाड
वे. मु. बगोबा माने गुरुजी
श्री. नानासाहेब रासने
,, त्रिंबक दामोदर रासने
,, कृष्णात मारूती रासने
,, तुकाराम शंकर उंडे
सौ. अनुसयाबाई सखाराम चौधरी
श्री. विष्णुपंत गोविंद देव
प्रो. गणपतराव नरके
श्री. केकसरु हुरमजी पारशी
,, दामोदर रामकृष्ण बापट
,, मनोहर रा. सामंत
,, वि. दा. भावे
,, सिताराम पवार
,, भाऊसाहेब धुमाळ
,, प्रल्हादराव तलाटी

श्री. पी. ए. दारुवाला
,, मंगलदास शामदास ठक्कर
श्रीमती काशीबाई
भ्र. शंकरराव बोरावके
श्री. नारायण लक्ष्मणराव नाडकर
,, सदानंद पांडूरंग देसाई
,, गोविंद रघुनाथ खाडीलकर
,, रामभाऊ सामंत मंडळीसह
,, डिनसा पारसी

श्री. शंकर केशव गुप्ते
,, के. सी. स्टेशनमास्तर
,, श्रीनिवास मुदलीयार
,, गणेश शिवराम पाटणकर
,, रामभाऊ कारखानीस
सौ. कमलाबाई के. गुप्ते
,, गुलाबबाई रघुनाथ राजे
मे. रा. काकडे मामलेदार
,, चौधरी मामलेदार सो.

## माहे आक्टोबर १९३८ चे शिर्डीवृत्त

१ श्रीचा पुण्यतिथी उत्सव अत्यंत उत्ताम झाला. उत्सवास प्रारंभ ता. ३-१०-३८ सोमवार पासून होऊन समाप्ती ता. ७-१०-३८ शुक्रवार रोजी झाली. यंदाचे साली अतिशय पाऊस असल्यामुळें भक्तमंडळी जशी यावी तशी आली नाहींत. उत्सवाचे कार्यक्रम चांगले झाले. संस्थानचे गवईबुवा यांची कीर्तनें ता. ३—५—६—८ अशी चार झाली. श्रीचे समाधीवर बऱ्याच भक्तमंडळींनी रुद्राभिषेक केले. श्रीचे पुण्यतिथीचें दिवशी श्री. बाळासाहेब देव यांचें कीर्तन झाले. गोपालकाला कीर्तन श्री. बाळासाहेब देव यांनीं केलें. उत्सवांत रथाची व पालखीची अशा दोन मिरवणूकी झाल्या. भारूड, अभंग, सोंगे, वगैरे कार्यक्रम झाले. उत्सवात भोजन समारंभ उत्तम झाला. एक दिवशी गूळ शिरा व चार दिवस पाढरपोळी, वरण भात, भाजी, आमटी, चटणी वगैरे जिन्नस मनमुराद होते. श्रीचे बागेंत शेवटी भोजन समारंभ होऊन उत्सव आटोपला. एक दिवस सं. क. ची सभा झाली. अतिशय पावसामुळे नद्या ओघाचे पुरामुळे श्री. रा. ब. भाऊसाहेब धुमाळ, वकिल, नाशिक हे येऊ शकले नाहींत. मात्र मागाहून श्रीचे दर्शनास आले होते.

२ उत्सवास गोरगरीब लोकास श्री. डि. एम. राजा यानी दोन रुपयाचे तांदुळ वाटले.

३ ता. १९-१०-३८ आश्विनवद्य ११ बुधवार रोजी सं. गवईबुवांचे कीर्तन झाले.

४ श्रीस लघुरुद्र श्री. आत्माराम शिरोडकर यांचा श्री. बाळासाहेब देव यांचे मार्फत झाला.

५ श्री. रा. ब. भाऊसाहेब धुमाळ, नाशिक, यांनी एक कंदील व उदबत्तीचे घर ( मोठे ) पीतळी अर्पण केली हस्ते श्री. नानासाहेब रासने.

६ श्री. बा. वि. उर्फ बाळासाहेब देव यानीं स्वतः श्रींस एकादशीचे दिवशी अभिषेक केला ता. १९-१०-३८ व द्वादशीस ता. २०-१०-३८ रोजी बाराब्राम्हण सुवाशीण इतर सर्वमंडळीस लाडवाचे भोजन दिले. सुमारें ५०।६० पान झाले. द्वादशीस श्रीस नेवेद्यही केला. रात्रौ द्वारकाबाई व श्रीचेचावडींत चार शेर तेलाच्या पणत्या लावून दिपोत्सव केला. शिरडीत आले पासून श्री. बाळासाहेब देव यांचे दररोज श्रीमंदिरांत दुपारी श्रीज्ञानेश्वरी प्रवचन होत असे.

७ श्रीस श्री. हिरालाल माणकलाल उद्दाण, बडोदा, यांचा दुधाचा अभिषेक श्री. ऑ. चिटणीस यांचे पत्रावरून ता. २३-१०-३८

८ श्री. वसंतराव गोरक्षकर यांचा श्रीस दोन दिवस अभिषेक, दोन दिवस नैवेध, ता. २३-१०-३८ व ता.२४-१०-३८ रोजी झाला. हस्ते सगुणराव, शिर्डी.

९ श्री. सुब्रह्मण्य, मद्रास, यांचा श्रीस कोजागिरीचे दिवशी दुधाचा अभिषेक श्री. सामंतसाहेब यांचे सांगणेवरून.

१० श्री. सालसकर श्री. कोडोळ, मुंबई, यानी ता. ५-१०-३८ रोजी श्रीस नैवेद्य केले, हस्ते सगुणराव, शिर्डी.

११ ता. २२-१०-३८ शनिवार रोजी दिपवाळी निमित्त श्रीस संस्थानतर्फे अभिषेक, पंचामृतस्नान, अभ्यंग स्नान व सायंकाळी श्रीलक्ष्मी–श्रीसरस्वती पूजन मोठयां थाटात श्री. प्रल्हादराव गुंफेकर यांचे हस्ते झाले. समारंभास श्री. तात्यापाटील कोते, व श्री. नानासाहेब रासने श्री. माधवराव सहस्त्रबुद्धे हजर होते. शोभेची दारू उडविण्यात आली. रोषनाई उत्तम करण्यात आली होती.

१२ श्री. बी. तिरुमलाचार्य, मद्रास, यांचा श्रीस स्पेशल अभिषेक करून आरती केली. ( श्री. बाळासाहेब देव ) व रुपया एक पेटीत टाकला. श्री. सामंत साहेब यांचे पत्रावरून.

१३ श्री. ठमाजी भिकाजी पाटील, शीळके, शिर्डी, पांच रुपयें भक्त मंडळीची वर्गणी दिली ता. ७-१०-३८

१४ श्री. अहिल्याबाई कुलकर्णी, पुणें, यानी को ग्री फंडास चार आणे ता. १०-१० ३८ रोजी दिले.

१५ श्री. माधव विष्णू सहस्रबुद्धे, शिर्डी, पांच रुपये भक्त मंडळीची वर्गणी दिली ता. २०-१०-३८

१६ ता. २४-१०-३८ सोमवार श्रीस सवा शेराचा शिराप्रसाद सायंकाळचे आरतीचे वेळी श्री. नानासाहेब खारकर यांचा त्यांचे पत्रावरून वाट णेत आला.

१७ शिर्डीची हवा पाणी हल्ली उत्तम आहे. वाचनालयवृत्त सोबत रा. विठ्ठलराव यानी जोडले आहे. लेंडीबागेंत दोन वेळेला महापूर आला. बागेची बरीच नुकसानी झाली.

आ. दास

बाळाजी काशीराम शिंपी, जमादर

---

## नोव्हेंबर १९३८ मध्यें खालील गृहस्थांनीं शिर्डीला भेट दिली.

श्री. गणेश दामोदर सासवडकर
,, रविशंकर बा. रासने बरोबर मुलेबाळे होती.
,, विष्णू हरी दातार
,, रघुनाथ सखाराम मांडे
,, गोपाळ पिराजी उपलग
,, जगन्नाथ रा. वैद्य
,, रणछोडदास दा. गांधी
,, रंगनाथ वासुदेव कट्टे
,, माधव रघुनाथ तेंडुलकर
,, सौ. मालतीबाई तेंडुलकर,
,, जी. मंगपतीराव
,, दत्तात्रय अनंत जोशी
,, महादेव रामचंद्र देवधर

श्री अंबादासराव
,, लक्ष्मण हरी पुरे.
,, लक्ष्मण गणेश पेंडसे
,, वामन गणेश पेंडसे,
, पंडित मोरेश्वर नातू
,, केशवराव बेंद्रे
,, जगन्नाथ मास्तर, बीड
,, चीफ जस्टीस
,, नरसिंह स्वामी
,, वासुदेव म. कोलंगडे
,, उद्धवराव कुलकर्णी
मे. मामलेदार साहेब
मे. प्रांतसाहेब
श्री. दत्तोपंत देशपांडे
,, माधवराव वाघ

# माहे नोव्हेंबर १९३८ चे शिर्डीवृत्त

१ ता. ३–११–३८ गुरुवार कार्तिक शु. ११ महाएकादशी निमित्त संस्थानतर्फे श्रीस अभिषेक, ( गुरुवार रोजी अभिषेक संस्थानतर्फे नेहमी असतोच त्याप्रमाणें ) नंतर पंचामृत, अभ्यंग स्नान, रात्रौ पालखीची मिरवणूक व नंतर संस्थान गवई यांचें कीर्तन झाले. या कार्यक्रमास संस्थानचे विश्वस्त श्री. रा. ब. भाऊसाहेब धुमाळ, नाशीक, हे हजर होते.

२ संस्थान गवईबुवा यांची या महिन्यांत चार कीर्तनें झाली. ता. ३–११–३८ गुरुवार व ता. १८–११–३८ शुक्रवार व १९–११–३८ श्रीज्ञानेश्वर पुण्यतिथी निमित्त ता. ५–११–३८ शनवार रोजी हे कीर्तन मुद्दाम श्री. रा. ब. भाऊसाहेब धुमाळ यानी करणेस सांगितलेवरून झालें.

३ श्री. रा. ब. भाऊसाहेब धुमाळ, नाशीक, या महिन्यात तीनवेळा येथें येऊन गेलें. ता. ३–११–३८ गुरुवार, ता. ५–११–३८ शनवार व ता. २९–११–३८ मंगळवार असे येऊन श्रीचे दर्शन घेऊन गेले.

४ श्री. दादाजी गोपिनाथ जोशी, दादर, यांचे गोरगरीबास कढीभाताचे जेवण झाले हस्ते नानूभट पूजारी.

५ श्री. नानासाहेब खारकर यांचे पत्रावरून श्रीमंत सरकार भासाहेब देवास ( जूनियर ) यांचा श्रीस अभिषेक व सुवाशिण ब्राह्मण पूजन झाले. ता. ६–११–३८ रविवार.

६ श्री. सौ. जानकीबाई रासने, पुणें, श्री. सौ. सुंदराबाई रासने वगैरे श्री. नानासाहेब रासने यांचे घरची मंडळी श्रीचेदर्शनास आली होती. रात्रौ श्रीस साखरभाताचा नैवेद्य केला. ता. ११–११–३८

७ श्री. ताराबाई, बेलापूर, यानी श्रीपुढें गायनाची हजेरी दिली. ता. २३–११–३८

८ चंद्र ग्रहणानिमित्त संस्थानतर्फे श्रीस अभिषेक, मंगलस्नान झाले. ता. ८–११–३८

९ श्री. नानासाहेब गायधनी, नाशीक, यानी दोन बत्त्या श्रीस अर्पण केल्या. हस्ते श्री. रा. ब. भाऊसाहेब धुमाळ.

१० शिर्डीची हवापाणी उत्तम आहे.

आपला नम्र

बाळाजी काशीराम शिंपी, चोपदार

# श्री ल. दा. बा. वाचनालयवृत्त

## शेरा

बाल्यावस्थेत असणारें आजचे शिर्डीचें वाचनालय अत्यंत गोंडस स्वरुपात आहे; यांत शंकाच नाहीं. श्रीसाईभक्ताकडून या वाचनालयाला हातभार लावला गेल्यास एका उज्वल साईस्मारकास मदत केल्यासारखे होणार आहे ! श्रीनाथ सदर पुण्यकृत्य करण्यास भक्तगणांच्या मनांत प्रेरणा करतीलच, परंतु साहित्यप्रेमी समाजानें सदर वाचनालयास हस्तें मदत जमविण्याचे प्रयत्न केल्यास शिर्डी संस्थानची क्षेत्र याद्दष्टीनें भरभराट करण्याचें श्रेय त्यास लाभणार आहे. यापुढें ( प्रतोद ) साप्ताहिक विनामूल्य या वाचनालयाला येत राहील.

ता. १८ नोव्हेंबर १९३८

मालतीबाई तेंडुलकर
संपादक—प्रतोद

---

( आठवड्याचा नवाकाळ ) वाचनाल्यांत एक वर्षापुरतां वर्गणी करून सुरू केला आहे. वर्गणी देणारे विठलराव गवई, बाळा गुरव, सगुणराव, बाजीराव, बाबु मारवाडी अशांनी सुरु केलें.

आपला नम्र सेवक
विठ्ठलराव

# देणगी (GIFTS)

M. S. Ranjit, B. A. LL.B.
Advocate.

34, Mugbhat Cross Lane,
Bombay: 12 th Sept. 1939.

To,
Shridhar Narayan Kharkar, Esqr.
Honorary Secretary,
Shree Sai Baba Sansthan, Shirdi.
37, Charai Road, Thana.

Dear Sir,

On behalf of my clients Mr. Krishnarao S. Navalkar and Dr. G. S. Navalkar, I beg to inform you that my clients have this day executed the deed of Gift regarding the Navalkar—Wada at Shirdi in favour of the Trustees of the Sansthan, which your committee was good enough to accept and for which my clients feel grateful to you and your Committee.

Thanks are due to the everactive Sai Bhakta Mr. Vasantrao your new Trustee, who not only was present at the time of the execution, but witnessed the said document. The said document has been made returnable to Mr. Vasantrao who, in his turn will delive the same to the Authorities.

By the grace of Shree Sai Baba everything has gone on pretty well so far.

I have to request you to be good enough to take necessary steps in the matter of the pending criminal prosecution against my clients in the Court of the 1st Class Magistrate at Kopargaon, Dist. Ahmednagr Re: the repairs or pulling down of the Navalkar—Wada at your earliest convenience as the time granted by the said Court to my clients expires in the third week of the current month.

Thanking you in anticipation.

Yours Sincerely,
Sd/ M. S. Ranjit.

Copies forwarded to the members of the Sansthan Committee for information.

Sd/ S. N. Kharkar.
37, Charai Road, Thana,
13th September 1939.

## विक्रीस तयार पुस्तकें. पोस्टेज व व्ही. पी. खर्च अलाहिदा पडेल.

| कापडी बांधणीचीं:— | रु. आं. पै. |
|---|---|
| श्रीसाईलीला मासिक, वर्ष १ ते ७ प्रत्येक वर्षास | ३ —४—० |
| श्रीसाईलीला मासिक, वर्ष ८ ते १३ प्रत्येक वर्षास | १—१२—० |
| श्रीसाईसच्चरित, कै. आण्णासाहेब दाभोळकरकृत | ३—८—० |
| श्रीकेकावली, यशोदा पांडुरंगी टीकेसहित कागदी बांधणीचीं | २—०—० |
| भक्तिलीलामृत पोथी श्री. ह. भ. प. दासगणूकृत. | |
| शिरडीचे श्रीसाईबाबांची ओळख व भक्तांचे अनुभव श्री. बी. व्ही. एन.स्वामीकृत. ( इंग्रजी ) | ०—६—० |
| श्रीसाईबाबा ऑफ शिरडी, रा. ब. प्रधानकृत ( इंग्रजी ) | १—०—० |
| श्री बा. वि. देवकृत कागदी बांधणीचीं:— | |
| श्रीसाईबाबा पुण्यतिथि कीर्तनाख्यान | ०—२—० |
| श्रीसाई दत्तजन्म कीर्तनाख्यान | ० —२—० |
| कै. श्री. नानासाहेब चांदोरकर आख्यान | ० —२—० |
| श्रीद्वारकामाई संशोधन अंक | ० —४—० |
| श्रीसाईकाला कीर्तनाख्यान | ० —४—० |
| इतर पुस्तकें:— | |
| श्रीसाईलीला, सुटे अंक, जुने व नवे, प्रत्येक अंकास | ० —४—० |
| कै. श्री. हरि सिताराम दीक्षित चरित्र अंक | ० —८—० |
| कै. श्री. म्हाळसापतीं चरित्र अंक | ० —४—० |
| श्रीसद्गुरुसाईगुणोपासना | ० —२—० |
| गाईड टु शिरडी, ( इंग्रजी ) | ० —२—० |
| भक्तांचे अनुभव–रा. सा. पपय्या चेटीकृत ( तेलगू भाषेंत ) | ० —८—० |
| श्रीसाईबाबांचा फोटो, क्याबिनेट साईज | ० —८—० |
| ,, कार्ड साईज. | ० —६—० |
| ,, लहान कार्ड साईज. | ० —४—० |
| ,, लॅकेट साईज. | ० —१—६ |
| ,, मोठ एनलार्जमेंट. [ ११ × ८] | ४ —०—० |

वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—

रा. रा. रा. बा. चैतास, एडिटर, साईलिला, दादर– मुंबई नं. १४
रा. रा. रामचंद्र रामकृष्ण सामंत, ४५, टर्नररोड, वांद्रें, मुंबई नं. २०
रा. रा. श्रीधर नारायण खारकर, ३७,चरईरोड, ठाणें.
रा. रा. बाळा पिलाजी गुरव, मु. शिरडी, पो. राहता, जि. नगर.

श्रीसाईबाबांचे तीन रंगांतील चित्र ( १०'' × १२ '' ) ०—३—०
रा. रा. दा. वि. सांबारे, वर्तकवाडी, तेजपाळरोड, विर्ले पार्ले यांचेकडे मिळेल.

रा. रा. वामनराव प्राणगोविंद पटेल, हेडमास्तर, उमरेठ एज्युकेशन सोसायटीचे स्कुल, उमरेठ, जि. कयरा ( गुरुस्मृती नांवाचे श्रीसाई-बाबाविषयीं गुजराथी पुस्तक. )

दक्षिणा प्राइज कमिटीने बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रे व मासिकांनी उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणूमहाराज यांनी रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चापेकर, M. A. LL. B. यांनी प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

## श्री पासष्टी-भावार्थ-दीपिका

हा नरेंद्र बुक डेपो, दादर, मुंबई येथे मिळेल.

कापडी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.

# सांडू ब्रदर्स

ओरिजिनल

# ब्राह्मी तेल

डोक्याचे सर्व विकारांवर

खजुरासव

दमा, खोकला, व क्षय

अश्वगंधादि काढा, योगराजगुग्गुळ

सर्व प्रकारचे वातविकारांवर.

## द. कृ. सांडू ब्रदर्स,

आर्यौषधि-कारखाना
चेंबूर-मुंबई.


सूचना:—कोणास जाहिराती देणे असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

| श्रीधर नारायण खारकर | रामचंद्र वासुदेव घैसास |
|---|---|
| २०, नवई, रोड, ठाणे. | लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग |
| | नं. २, गोखले रोड मध्ये, दादर. |


हे मासिक कर्नाटक प्रेस कस्तुरचंद बिल्डिंग—दादर मध्ये छापून रामचंद्र वासुदेव घैसास यांनी लो. टिळक ज्युबिली बुक डिपो नं. २ गोखले रोड दादर येथे प्रसिद्ध केले.